cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक


बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२७६ | मंगळवार दि.३ फेब्रुवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

### संपादकीय

## समानतेच्या नावाने ध्रुवीकरण?

समाज आधुनिक झाला आहे, डिजिटल साक्षर झाला आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. मात्र या प्रगतीच्या गोंडस भाषेमागे एक कटू वास्तव आजही दडलेले आहे. जातीय भेदभाव. तो पूर्वीइतका उघड नसेल, कदाचित दिसतही नसेल; पण म्हणून तो संपला आहे, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही.

# युरिया खताच्या दरावर मोठा निर्णय; ४० किलो बॅगेसाठी २५४ रुपये किंमत



**दिल्ली । वृत्तसंस्था**

**शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात युरिया उपलब्ध व्हावा आणि खतांच्या काळाबाजाराला आळा बसावा, यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने सल्फर कोटेड युरियाच्या ४० किलो बॅगेसाठी २५४ रुपये कमाल विक्री किंमत निश्चित केली आहे.**

हा निर्णय खत (अकार्बनिक, सेंद्रिय किंवा मिश्रित) (नियंत्रण) आदेश, १९८५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आला असून, आदेश जारी केल्याच्या तारखेपासून तो देशभरात लागू झाला आहे. या अधिसूचनेवर मंत्रालयाचे सहसचिव फ्रँकलिन एल. खोबुंग यांनी स्वाक्षरी केली आहे. कृषी मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार ही कमाल किंमत देशातील सर्व डीलर्स, उत्पादक, आयातदार तसेच पूल हँडलिंग एजन्सींमार्फत विक्रीसाठी लागू राहणार आहे. चहा, कॉफी, रबर उत्पादकांसह सर्व प्रकारच्या शेतकऱ्यांना या दराचा लाभ मिळणार आहे. मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, २५४ रुपयांची ही कमाल किंमत जीएसटी किंवा ▶▶ पान २ वर

## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊ नये म्हणून रचला कट; वडेट्टीवार यांचा गंभीर आरोप



**नागपूर । प्रतिनिधी**

आपल्या संस्कृती नुसार दशक्रिया झाल्यावर घरातील सुरळीत कामकाज सुरू होते. पण राज्यातील राजकारण इतके सडके झाले आहे की कसलीही वाट न बघता शपथविधीचा कार्यक्रम करण्यात आला. यातूनच दोन्ही राष्ट्रवादीचे गट एकत्र येऊ नये हा कट शिजला, असा गंभीर आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात ▶▶ पान २ वर

## आ.सुरेश धस यांनी वाढदिवसानिमित्त मच्छिंद्रनाथ गडावर शब्दरूपी स्विकारल्या शुभेच्छा

### समर्थकांनी दिली मंदिर जीर्णोद्धारासाठी कोट्यवधी रुपयांची देणगी



**आष्टी । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली दुर्दैवी निधनाच्या पार्श्वभूमीवर नाथभक्त माजी मंत्री तथा आमदार सुरेश धस यांनी आपला ५६ वा वाढदिवस कोणताही जल्लोष न करता श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर साधेपणाने साजरा केला. श्री मच्छिंद्रनाथ बडे बाबांच्या सानिध्यात त्यांनी समर्थक, कार्यकर्ते व भाविकांच्या शुभेच्छा स्वीकारल्या.

यावेळी आ. सुरेश धस यांनी शाल, श्रीफळ, फेटा किंवा कोणत्याही भेटवस्तू स्वीकारण्यास ▶▶ पान २ वर

## २५ हजारांची लाच घेतांना सहकार अधिकारी पकडला

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील सहाय्यक निबंधक कार्यालयातील सहकार अधिकारी संतोष भंडारी यास २५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (एसीबी) पथकाने सोमवारी दुपारी रंगेहात पकडले. एका पतसंस्थेविरुद्धच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी भंडारी याने संबंधित संस्थेच्या सचिवाकडे ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यापैकी पहिला हप्ता स्वीकारताना ही मोठी कारवाई करण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पतसंस्थेच्या विरोधात असलेल्या तक्रारींचे निवारण करण्याच्या बदल्यात भंडारी यांनी लाचेची मागणी केली होती. या प्रकरणी ▶▶ पान २ वर





















cmyk

## अग्रलेख

# समानतेच्या नावाने ध्रुवीकरण?

समाज आधुनिक झाला आहे, डिजिटल साक्षर झाला आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. मात्र या प्रगतीच्या गोंडस भाषेमागे एक कटू वास्तव आजही दडलेले आहे. जातीय भेदभाव. तो पूर्वीइतका उघड नसेल, कदाचित दिसतही नसेल; पण म्हणून तो संपला आहे, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. आजही जातीमुळे पोळले जाणारे आणि जातीमुळेच पोळत राहणारे या दोन्ही टोकांवर उभे असलेले गट जात हीच आपली ओळख आणि आपले अस्त्र मानून जगत आहेत. ही मानसिकता शिक्षण संस्थांमध्येही तितकीच ठळकपणे दिसते. विद्यापीठे आणि महाविद्यालये ही प्रबोधनाची केंद्रे असायला हवीत; पण तिथेच जातीय भेदभावाची बीजे रुजलेली असल्याची अनेक उदाहरणे आहेत. काही ठिकाणी त्याचे परिणाम इतके टोकाचे ठरले की विद्यार्थ्यांना आत्महत्येचा मार्ग पत्करावा लागला.

याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) भेदभाव रोखण्यासाठी नवे नियम लागू केले. हेतू नक्कीच उदात्त आहे. मात्र दुर्दैवाने हेच नियम आज नव्या संघर्षाचे कारण ठरताना दिसत आहेत. या नियमांविरोधात सर्वोच्च न्यायालयात तब्बल बारा याचिका दाखल झाल्या असून, न्यायालयाने तूर्तास त्यांना स्थगिती दिली आहे. मार्चमध्ये पुढील सुनावणी होणार आहे. हा काळ शांतपणे विचार करण्यासाठीचाएक 'कूलिंग पीरियड' असायला हवा होता; पण प्रत्यक्षात तसे घडताना दिसत नाही. उलट हा विषय अधिकच पेटवला जात आहे. उत्तर भारतात याची धग अधिक तीव्र आहे. विद्यार्थ्यांच्या संघटनांबरोबरच वकिलांच्या संघटनाही आक्रमक झाल्या आहेत. काही सरकारी अधिकाऱ्यांनी तर राजीनामे दिले आहेत. हा विषय किती गांभीर्याने घेतला जात आहे याचे हे द्योतक असले, तरी भविष्यात तो किती धोकादायक वळण घेऊ शकतो याचाही तो इशारा आहे. आज शिक्षण संस्थांतून बाहेर पडणारे विद्यार्थी हे उद्याचे नागरिक असणार आहेत. त्यांच्या मनात जर आजच 'भेदभाव संपवण्याच्या' नावाखाली नव्या प्रकारचे विष पेरले गेले, तर ते समाजात सलोख्याने राहतील का, हा प्रश्न कुणालाच पडलेला दिसत नाही. समानतेच्या कितीही घोषणा केल्या, तरी नकारात्मकतेने भरलेल्या मनांमध्ये त्या रुजणार नाहीत. खरे तर विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये भेदभावाविरोधात मार्गदर्शक सूचना याआधीही अस्तित्वात होत्या. मात्र त्या पाळण्याचे कायदेशीर बंधन नव्हते. नवे नियम ते बंधन घालतात. प्रत्येक उच्च शिक्षण संस्थेत 'समानता समिती' स्थापन करणे, त्यात महिला, ओबीसी, एससी, एसटी आणि दिव्यांग घटकांचे प्रतिनिधित्व असणेया तरतुदी कागदावर योग्य वाटतात. त्यातून वंचित घटकांना तक्रार करण्याचा आधार मिळेल, असा दावा केला जातो. मात्र याच ठिकाणी संशयाची पाल चुकचुकते. नियमांना विरोध करणाऱ्यांचा आक्षेप असा आहे की, खोट्या तक्रारींना आळा घालण्यासाठी कोणतीही ठोस संरक्षणात्मक तरतूद नाही. एखादी खोटी तक्रार दाखल झाली, तर ज्याच्यावर आरोप आहे त्याला स्वतःचे संरक्षण करण्याची प्रभावी संधी मिळेल का, याबाबत स्पष्टता नाही. कारवाईचे स्वरूप काय असेल, हेही धूसर आहे. कारवाई केली नाही, तर संस्थेची यूजीसी मान्यता रद्द होऊ शकते हा दबाव संस्थांवर कायम राहणार आहे.

या पार्श्वभूमीवर 'यूजीसीने उच्च शिक्षणासाठी नवा ॲट्रॉसिटी कायदाच आणला आहे' असा प्रचार सुरू झाला आहे. समाजमाध्यमांवरून, संघटनांमधून, अगदी काही कवी-कलाकारांमधूनही परस्परविरोधी, विखारी भूमिका घेतल्या जात आहेत. शंकांचे निरसन करण्याऐवजी त्या अधिक तीव्र केल्या जात आहेत. समानता हा उद्देश नक्कीच स्वागतार्ह आहे. पण चांगल्या हेतूने घेतलेल्या निर्णयांबाबत उपस्थित होणाऱ्या शंकांचे निरसन करणे ही जबाबदारीही निर्णय घेणाऱ्यांचीच असते. ती जबाबदारी टाळली गेली, तर समानतेच्या नावाखाली नव्या ध्रुवीकरणाची पायाभरणी होण्याचा धोका नाकारता येत नाही. सुधारणेच्या दिशेने टाकलेले प्रत्येक पाऊल सर्वंकष विचारातूनच पडायला हवे. अन्यथा भेदभाव संपवण्यासाठी आणलेला नियम समाजात भीती, संशय आणि द्वेष पसरवणारा ठरू शकतोआणि तेच खऱ्या अर्थाने धोक्याचे आहे.


## लोकनेत्याला साजेशे व्यक्तीमंत्व सुरेश आण्णा धस

ज्यांनी सत्ता उपभोगण्यासाठी नाही, तर सत्ता जनतेसाठी वापरण्यासाठी आयुष्य वेचलेअसे लोकनेते म्हणजे मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस! गावचा सरपंच म्हणून सुरुवात करून कुठलाही राजकीय वारसा नसताना, केवळ कर्तृत्वाच्या, संघर्षाच्या आणि जनतेच्या विश्वासाच्या बळावर थेट महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात तब्बल आठ खात्यांची धुरा समर्थपणे वाहणारा हा नेता म्हणजे राजकारणातील जिवंत इतिहास आहे.



हे यश कुठल्या दालनात बसून मिळाले नाही, तर शेतकऱ्यांच्या बांधावर, कष्टकऱ्यांच्या घामात आणि सर्वसामान्यांच्या दुःखात सहभागी होऊन कमावलेले आहे! सत्तेची खुर्ची बदलते, पण सुरेश आण्णा धस यांची नाळ आजही सामान्य माणसाशीच जोडलेली आहे. म्हणूनच विरोधकही मान डोलावतात आणि कार्यकर्ते छाती ठोकून म्हणतातहा आमचा नेता आहे! २ फेब्रुवारीजनतेसाठी झगडणाऱ्या, अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या आणि मराठवाड्याचा आवाज महाराष्ट्राच्या विधानभवनात घुमवणाऱ्या या रणखड्या लोकनेत्याचा जन्मदिवस! पंढरीच्या पांडुरंगाच्या चरणी एकच प्रार्थना अण्णांना लोखंडासारखे आरोग्य, अफाट आयुष्य आणि जनसेवेची अजूनही प्रखर ज्वाला लाभो! अण्णा, तुम जिओ हजारो साल साल के दिन हो पचास हजार!

:::शुभेच्छुक:::
तुमचा आणि शेवटपर्यंत तुमचाच सैनिक
**शरद रेडेकर**


# बीड येथे श्री गजानन महाराजांचा १४८ वा प्रकट दिन व रौप्य महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ

**बीड । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र शेगाव निवासी संतश्रेष्ठ श्री गजानन महाराज यांच्या १४८ व्या प्रकट दिनानिमित्त तसेच श्री गजानन महाराज मंदिर, एकनाथ नगर, बीड येथे मंदिर व मूर्ती स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भव्य धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने मंदिरात रौप्य महोत्सव वर्ष साजरे होत आहे दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत श्रीमद्? भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व श्री गजानन विजयग्रंथ पारायण आयोजित करण्यात आले आहे.**

या धार्मिक सोहळ्याचा शुभारंभ रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी झालाअसून सांगता रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होईल. दररोज सकाळी ९ ते १२ या वेळेत श्री गजानन विजयग्रंथ पारायण तर दुपारी २ ते ५ या वेळेत श्रीमद्? भागवत कथा होणार आहे. या कथांचे प्रवक्ते भागवताचार्य ह.भ.प. अंगद महाराज सातपुते (बीड) हे करणार आहेत. श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन माघ शुद्ध सप्तमी, शके १९४७, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी असून त्या दिवशी विशेष धार्मिक



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ७ वाजता श्रींचा अभिषेक, सकाळी १० वाजता भागवताचा गोकर्ण अध्याय, दुपारी १२ वाजता श्री गजानन महाराजांचा प्रकट दिन सोहळा व महाआरती संपन्न होणार आहे. दुपारी १ वाजता श्रींची पालखी मिरवणूक भक्ती कन्स्ट्रक्शन परिसरातून काढण्यात येणार असून त्यानंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १ फेब्रुवारी २०२६ पासून दररोज सकाळी ९ वाजता भाविकांना पारायणास बसता येणार आहे. या वर्षी मंदिर व मूर्ती स्थापनेस २५ वर्षे पूर्ण होत असल्याने हा प्रकट दिन सोहळा विशेष महत्वाचा मानला जात असून भाविकांसाठी ही एक दुर्मिळ आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या पवित्र भागवत सप्ताह, पारायण, प्रकट दिन सोहळा, पालखी मिरवणूक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे श्री गजानन महाराज मंदिर, एकनाथ नगर, बीड येथील विश्वस्त व आयोजकांच्या वतीने विनम्र आवाहन करण्यात आले आहे.

**।। गण गण गणात बोते ।।**
**।। श्री गजानन महाराज की जय ।।**

## बीडमध्ये भरदुपारी तलवारीने हल्ला

**बीड । पतिनिधी**

**शहरातील एका १९ वर्षीय विद्यार्थ्यावर तलवारीने सपा-सप वार करून हल्ला झाल्याची घटना आज दुपारी २ ते २.३० च्या सुमारास तेलगाव नाका भागातील आदित्य कॉलेज समोर घडली.या हल्ल्यात विद्यार्थी गंभीर जखमी झाला असून त्याच्या डाव्या हाताच्या दंडावर आणि पोटाच्या एका बाजूला गंभीर दुखापत झाली आहे. या प्रकरणी दुपारी उशिरापर्यंत पोलीसात नोंद झाली नव्हती.**

बीड शहरातील नाळवंडी नाका येथील रहिवाशी आदित्य गाडे (वय १९) याच्यावर सोमवार (दि.२) दुपारी २ ते २.३० च्या सुमारास तलवारीने हल्ला झाला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादानंतर तुंबळ हाणामारी होऊन हा हल्ला झाल्याचे सांगण्यात येत आहे. या हल्ल्यामध्ये आदित्यच्या शरीरावर दोन ते तीन ठिकाणी वार झाल्याचे दिसुन येत आहे. त्याला तातडीने जिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## पहिले महिला शासकीय अधिकारी यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

जालना । प्रतिनिधी

महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या महिला शासकीय अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सरहद संस्था पुणे यांच्या वतीने व महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने दि. ७ व ८ मार्च, २०२६ रोजी नवी दिल्ली येथे पहिले महिला शासकीय अधिकारी यांचे पहिले अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०२६ आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार जालना जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रामध्ये योगदान दिलेल्या प्रतिभाशाली शासकीय महिला अधिकारी यांनी त्यांची नावे संमेलनाचे प्रतिनिधी श्री. लेशपाल जवळगे मो. ८४८४०५५२५२ यांना कळवावी असे अवाहन उपजिल्हाधिकारी (सामान्य) नम्रता चाटे यांनी केले आहे.

# सर्वपक्षीय शोकसभेत दादांच्या आठवणींनी सर्वच गहिवरले

**मंठा । प्रतिनिधी**

**राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार हे सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. दादांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाला, त्यांच्यासारखा दूरदृष्टी असलेला नेता पुन्हा होणे नाही. अशा शब्दात सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दादांच्या आठवणी सांगताना अनेकांचा कंठ दाटून आला.**



येथील बाजार समितीच्या प्रांगणात सोमवार ता. २ रोजी झालेल्या शोकसभेत स्व. अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी माजी आ. सुरेशकुमार जेथलिया, शिवसेना जिल्हाप्रमुख तथा सभापती ए. जे. बोराडे, राष्ट्रवादीचे नेते ॲड. पंकज बोराडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल आकात, मां सभापती प्रल्हाद राव बोराडे,भाऊसाहेब गोरे, काँग्रेसचे परतुर तालुकाध्यक्ष बालासाहेब आकात, शिवसेना तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे,माजी जि. प. अध्यक्ष बळीराम कडपे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, संतोष वरकड, कल्याणराव खरात, अण्णासाहेब खंदारे, दत्तप्रसाद बनसोडे, पंजाब केंधळे, किसनराव मोरे, संभाजीराजे खंदारे, बाबाराव राठोड, सुरेश पवार, पोलीस निरीक्षक मनोज कुमार राठोड, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बबनराव गणगे, कयूमभाई कुरेशी, सीराजखान पठाण, शबाब कुरेशी, हरिभाऊ चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी माजी आ. सुरेश कुमार जेथलिया यांनी दादांच्या आठवणींना उजाळा दिला. सर्व समाजाला न्याय देणारे ते पुरोगामी विचारांचे नेते होते, अत्यंत शिस्तप्रिय आणि महाराष्ट्राला विकासाच्या उंबरठ्यावर घेऊन जाणाऱ्या नेतृत्वास आपण मुकलो असे सांगितले. शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे यांनी स्व. अजित दादा कार्यकर्त्यांना बळ देणारे नेते होते. दादांचे निधन ही मनाला चटका लावणारी घटना असल्याचे सांगून त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. काम करताना दादांनी कधी पक्ष पाहिला नाही असे सांगितले. ॲड. पंकज बोराडे यांनी काही दिवसापूर्वीच बारामती येथील होस्टेलला बैठकीच्या निमित्ताने भेट झाल्याचे सांगून प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला दादा आपलेसे वाटायचे, त्यांनी आपला ताठ बाणा आयुष्यभर कायम ठेवला. त्यांच्या सारखा नेता महाराष्ट्रात पुन्हा होणार नाही असे सांगितले. यावेळी कपिल आकात यांनी दादा सोबतच्या आठवणीना उजाळा दिला. यावेळी भाऊसाहेब गोरे यांनी दादांसोबतच्या आपल्या आठवणीं सांगताना त्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. अण्णासाहेब खंदारे यांनी शोकसभेत दादा सोबतच्या आठवणी सांगितल्या. या शोकसभेत बळीराम कडपे, बालासाहेब आकात, हरिभाऊ चव्हाण, गणेशराव शहाणे, एकनाथ काकडे, पत्रकार बाबूजी तिवारी, रावसाहेब महाराज, डॉ. बी जे काळे, माजी उपनगराध्यक्ष सिराज खान पठाण यांनी श्रद्धांजलीपर मनोगत व्यक्त केले. या शोकसभेला आर. आर. कुलकर्णी, विवेक घारे, तुळशीराम कोहिरे, प्रकाश घुले, शिवाजीराव सुरवसे, नितीन मोरे, हाजी जलीलभाई, जे के कुरेशी, अरुण वाघमारे, कबीर तांबोळी, सगीरखान पठाण, पप्पू दायमा, मंठा शहरातील सर्वपक्षीय पदाधिकारी, नेते, डॉक्टर असोसिएशन, वकील संघ, पत्रकार संघ, मराठा सेवा संघ, मुस्लिम बांधव, व्यापारी, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## विश्वजीत खरात उपनगराध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**घनसावंगी । प्रतिनिधी**

अंबड नगर परिषद चे भाजप उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी अंकुशराव बोबडे- भाजप किसान मोर्चा महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य,सर्जेराव जाधव अनुसूचित जाती मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अध्यक्ष,परमेश्वर सोनवणे- अनुसूचित जाती मोर्चा तालुकाध्यक्ष, भास्करराव पांढरे, अर्जुनराव माळोदे , हारीभाऊ तागडे, सुरेशराव उगले ,एकनाथ राठोड, अशोकराव जाधव, सदाशिव यादव, जयराम मिसाळ, नारायण आडणी ,बंडु आराध्य, कैलासराव बडे, लाला साहेब ,शिंदे अयलाजी जाधव ,रामजी परदेशी, सुरेश पोटे , संदीप काळे ,अंबादास माने ,भगनावराव पिताळे, हीगुडे मामा, भुजंग नाना कटुले, ज्ञानेश्वर चव्हाण ,लक्ष्मण अटकळ ,माहादेव खामोहीते, गणेश गुजर ,भाऊसाहेब रधे ,पंढरीनाथ कांळे ,नितेश राढोड, बळीराम मोरे , जाधव मामा , लक्ष्मण बिलोरे ,माणिकराव टेहेळे, प्रल्हादराव भालेकर ,रोहन भालेकर, कैलासराव काकडे, गजानन काकडे, हारीदास पवार ,वाढेकर मामा ,किरण गुडेकर ,राजेंद्र बिडे, धनंजय देशमुख, देवडे वकील, साहेब, नाशीर भाई, विश्वास तारगे, विष्णु डोके ,राजाराम काकडे, चत्रभुज आनदे, लक्ष्मणराव सोनवणे, शिवाजी घोगरे, आदी भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### युरिया खताच्या दरावर मोठा

इतर केंद्र व राज्य करांचा समावेश न करता निश्चित करण्यात आली आहे. लागू असल्यास, संबंधित कर विक्रीवेळी वेगळ्या स्वरूपात आकारले जाऊ शकतात. दरम्यान, लहान वजनाच्या युरिया पिशव्यांवर डीलर्सना पॅकिंग शुल्क आकारण्याची परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार २ किलो पिशवीसाठी १.५० रुपये, ५ किलोसाठी २.२५ रुपये, १० किलोसाठी ३.५० रुपये, तर २५ किलो पिशवीसाठी ५ रुपये अतिरिक्त शुल्क आकारता येणार आहे. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांना युरिया ठरावीक दरात मिळण्यास मदत होणार असून, खतांच्या दरवाढीवर आणि साठेबाजीवर नियंत्रण येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

---------------

### आ.सुरेश धस यांनी वाढदिवसानिमित्त मच्छिंद्रनाथ

नकार देत, समर्थक व भाविकांच्या शब्दरूपी शुभेच्छा स्वीकारल्या. वाढदिवसाच्या निमित्ताने उपस्थित नागरिक, कार्यकर्ते व भाविकांनी श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील गाभाऱ्याच्या बांधकामासाठी यथाशक्ती देणगी देत आपल्या लाडक्या नेतृत्वाच्या दीर्घायुष्याची व यशस्वी कार्याची कामना केली. या देणगीतून कोट्यवधी रुपयांचा निधी जमा झाला आहे. या प्रसंगी आष्टी तालुका पत्रकार संघाच्या वतीने आमदार सुरेश धस यांची गडावर सदिच्छा भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले की, ''श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील विकासकामांची वेळोवेळी पाहणी करावी. लाखो नाथभक्तांनी श्रद्धेने दान दिले असून मदतनिधीचा ओघ दिवसेंदिवस वाढत आहे.'' याचवेळी त्यांनी काही विघ्नसंतोषी व्यक्तींकडून गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याबाबत चिंता व्यक्त केली. बालाघाट परिसरातील डोंगरदऱ्यांमध्ये घडणाऱ्या अपघाती घटनांचा संबंध श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाशी जोडून चुकीच्या बातम्या प्रसिद्ध केल्या जातात, हे अयोग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडावर सुरू असलेल्या विकासकामांची सविस्तर व सकारात्मक माहिती समाजापर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी पत्रकारांना केले. पत्रकारांनी यावेळी मंदिराच्या गाभाऱ्याच्या सुरू असलेल्या कामांची पाहणी करून अत्यंत सुबक व कलाकुसरीच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले. नाथभक्त व सेवक या नात्याने आमदार सुरेश धस हे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, भाविकांसाठी विविध सोयीसुविधा निर्माण करण्याचे नियोजन त्यांनी केले आहे.परिसरातील गावोगावातून गाभाऱ्याच्या बांधकामासाठी देणगीचा ओघ सुरू असून, समाजहितासाठी संवेदनशील व संयतपणे कार्य करणाऱ्या आमदार सुरेश धस यांच्या कार्याचे नाथ संप्रदायातच नव्हे तर संपूर्ण देशभरातून कौतुक होत आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेकांच्या शुभेच्छा.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,सभापती राम शिंदे, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ,केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ,महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन,उच्च व तंत्रशिक्षण तथा संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील,भाजपा प्रदेश सरचिडणीस नवनाथ पडळकर, सुजितशिंग ठाकूर,खा.निलेश लंके,आ.महेश लांडगे,आ.विक्रम पाचपुते, आ.प्रशांत ठाकूर आ.नारायण कुचे ,आ.राहुल ढिकले आ.मोनिका राजळे,आ. नितेश राणे आ.भीमराव तापकीर,माजी आ.भीमराव धोंडे, ओमप्रकाश शेटे,नंदकिशोर मुंदडा, धनंजय देशमुख आदींनी दूरध्वनी समक्ष आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून आमदार सुरेश धस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**३५७ रक्तदात्यांनी केले स्वयंस्फूर्त रक्तदान**

आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त कोणताही दिखावा न करता समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले. याच अनुषंगाने श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावर आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ३५७ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्त रक्तदान करून सामाजिक जबाबदारीचे भान जपले.

**१ कोटी ३३ लाख रुपयांची देणगी झाली जमा**

आ. सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त कोणताही दिखावा, हार-दुरे, फेटे किंवा भेटवस्तूंवर खर्च न करता त्या सर्व निधीचा वापर थेट श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरील मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी करण्यात आला. समर्थक, कार्यकर्ते व भाविकांनी श्रद्धेने दिलेल्या देणगीतून एकूण १ कोटी ३३ लाख रुपयांचा निधी जमा झाला आहे. ही देणगी श्री मच्छिंद्रनाथ गडाच्या गाभारा बांधकाम व इतर विकासकामांसाठी वापरण्यात येणार आहे.

-----------

### राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येऊ नये म्हणून

दोन्ही पक्ष विलीन होण्याबाबत चर्चा अंतिम टप्प्यात होती. आपल्या पक्षाबाबत त्यांनी भाजप किंवा मुख्यमंत्र्यांना सांगणे अपेक्षित होते का? त्यांच्या पक्षाचे निर्णय ते घेऊ शकत नव्हते की त्यासाठी भाजपची परवानगी लागत होती? असा टोला वडेट्टीवार यांनी यावेळी लगावला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूपेक्षा दोन पक्षाच्या विलीनीकरण बाबत जास्त चर्चा झाली. यातून काही लोकांना आनंद झाला. आपल्या मोठ्या नेत्याचा मृत्यू झाल्यावर दोन चार दिवस ही नेते थांबू शकले नाही यातून राजकारणात नैतिकता आणि नीतिमत्ता राहिली नाही हे महाराष्ट्र बघत आहे, अशी टीकाही विजय वडेट्टीवार यांनी केली. अजित पवार यांच्या पक्षातील सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल या नेत्यांना एनडीएसोबत राहण्याची अपरिहार्यता आहे. त्यांच्यावर विविध आरोप झाले आहेत. अशा वेळी शांत झोप लागावी यासाठी भाजपला साथ देण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नाही यातूनच विधाने केली जात असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. अजित पवार यांच्या मृत्यूबाबत देखील विविध शंका उपस्थित केल्या जात असून, या प्रकरणी निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे याचा पुनरुच्चार वडेट्टीवार यांनी केला.

----------

### २५ हजारांची लाच घेतांना सहकार

पतसंस्थेच्या सचिवांनी जालना येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे रीतसर तक्रार नोंदवली होती. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सोमवारी दुपारी अंबाजोगाई येथील सहाय्यक निबंधक कार्यालयात सापळा रचला. लाचेच्या एकूण ५० हजार रुपयांपैकी २५ हजार रुपये स्वीकारण्याचे ठरले होते. ही रक्कम स्वीकारताना पथकाने भंडारी यांना रंगेहात ताब्यात घेतले. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून संतोष भंडारी याच्यावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून या प्रकरणातील अधिक तपशील तपासानंतर समोर येईल असे पथकाकडून सांगण्यात आले आहे.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



## थोडक्यात

### रोळसगाव येथे गजानन महाराज प्रगट दिन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील रोळसगाव येथे गजानन महाराज प्रगट दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या निमित्ताने संत गजानन विजय ग्रंथाचे पारायण शुक्रवार दिनांक ६ ते रविवार दिनांक ८ फेब्रुवारी दरम्यान सकाळी सकाळी नऊ ते ११ या वेळेत होणार असून रविवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी विष्णूयाग यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त हभप गणेश महाराज कचरे यांचे सकाळी ११ ते १ दरम्यान कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.




### संत रविदास महाराज यांची जयंती जिव्हाळा अनाथ बेघर आश्रम येथे मोठ्या उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

दिनांक एक फेब्रुवारी २०२३ रोजी संत रविदास महाराज यांची जयंती जिव्हाळा अनाथ बेघर आश्रम येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष लखन भैय्या परदेशी यांनी बोलताना म्हटले की संत रोहिदास महाराजांची जयंती ही वर्गणी मुक्त डीजे मुक्त साजरी करण्याचा निर्णय सर्वांमध्ये घेण्यात आला व सामाजिक क्षेत्रात जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला व इथून पुढे जयंती उत्सव समिती डीजे मिरवणूक अशा गोष्टीवर खर्च न करता सामाजिक क्षेत्रात साजरी केली जाईल असे सांगितले. व त्यानंतर डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर भाजप नेते नेते यांनी लखन परदेशी यांनी घेतलेल्या निर्णयाचे अभिनंदन केलं व सर्वांना जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत वैद्य जिव्हाळा संस्थेचे सदस्य यांनी केला तर आभार प्रदर्शन वंजारे सर यांनी केले यावेळेस समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### कवी अनिलकुमार होळकरांना इंडियन टेलिव्हिजन पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

दादासाहेब फाळके इंडियन टेलिव्हिजन अवॉर्ड २०२६ चा भव्य सोहळा, हॉटेल सी प्रिन्सेस जुहू मुंबई येथे संपन झाला.यात प्रसिद्ध कवी-लेखक अनिलकुमार बाबूराव होळकर यांना लेखक, दिग्दर्शक, गीतकार आणि कवी ऑफ द इयर २०२६ हा अवार्ड देऊन सन्मानीत करण्यात आले. हा पुरस्कार भुरळ डोळ्यांची या मराठी चित्रपटासाठी हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री मोनिका बेदी आणि फेस्टिवल डायरेक्टर अखिलेश सिंग यांच्या हस्ते प्रदान करून अनिलकुमार होळकर आणि चित्रपट संकलक प्रभातकुमार होळकर यांना सन्मानीत करण्यात आले.यावेळी देशातील विविध राज्यातील तसेच विदेशातीलही अनेक प्रतिभावंतांना विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले.



भुरळ डोळ्यांची या मराठी चित्रपटासाठी यापूर्वी अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. या चित्रपटात शरद लांडगे, मनिषा मोरे, अनिलकुमार होळकर, सोनल मोरे, रविकिरण जावीर, आशा साठे (पाटील ) यांच्यासह अनेक कलाकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

# अंबाजोगाईच्या शिबिरात १५३ बालकांची मोफत हृदय तपासणी

## २० चिमुकल्यांवर पुण्यात होणार मोफत उपचार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील घुगे हार्ट अँड क्रिटिकल केअर हॉस्पिटल मध्ये शून्य ते अठरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत बालहृदय रोग तपासणी व २-डी इको कलर डॉपलर शिबीर उत्साहात पार पडले.या शिबिरात एकूण १५३ बालकांची तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली . त्यापैकी गंभीर आजार आढळलेल्या २० बालकांवर पुणे येथे मोफत हृदय शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती हृदयरोग तज्ज्ञ डॉ. नवनाथ घुगे यांनी दिली.



हे भव्य शिबीर घुगे हॉस्पिटल, आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम महाराष्ट्र शासन आणि लिटल हार्ट केअर हॉस्पिटल, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. याप्रसंगी आय.एम.ए. महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती. व्यासपीठावर रोटरीच्या अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक, पुणे येथील प्रसिद्ध बालहृदय रोग तज्ज्ञ डॉ. पंकज सुगांवकर, हृदय रोग तज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.राहुल धाकडे, बालरोगतज्ञ डॉ.श्रीनिवास रेड्डी, बालरोगतज्ञ डॉ.सुधीर धर्मपात्रे, डॉ.सचिन पोतदार, डॉ.अतुल शिंदे, डॉ. महेंद्र लोमटे आणि चे समन्वयक रमेश तांगडे आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ.नवनाथ घुगे यांनी आपल्या प्रास्ताविकात शिबिराचा उद्देश स्पष्ट करत गरजू रुग्णांना दर्जेदार उपचार मिळवून देण्याचा मानस व्यक्त केला. आजपर्यंत अनेक शिबिराच्या माध्यमातून २०० पेक्षा जास्त बालकांची मोफत शास्त्रक्रिया केल्याचे नमूद केले त्यासोबतच यापूर्वी घेण्यात आलेल्या शिबिराच्या माध्यमातून अनेक पालकांना हृदयाच्या समस्यांचे निदान झाले त्यामुळे त्यांच्यावर पुढील उपचार करण्यात आल्याने आज ती बालके ठणठणीत बनली आहेत. येणाऱ्या काळात सुद्धा अशा शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब व सर्वसामान्य रुग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न असणारच त्याचे डॉ. नवनाथ घुगे यांनी सांगितले. या शिबिरास नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी आवर्जून भेट देत तज्ञ डॉक्टरांचा सत्कार केला.

डॉ.पंकज सुगांवकर व डॉ. श्रीनिवास रेड्डी यांनी बालकांमधील हृदयविकाराची लक्षणे आणि आधुनिक उपचार पद्धतींबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

शिबिरामध्ये बालकांची २ डी इको कलर डॉपलरची तपासणी डॉ. पंकज सुगांवकर यांनी केली. आणि यामध्ये ज्या बालकांना हृदय शस्त्रक्रियेची गरज असेल त्यांची ते मोफत शस्त्रक्रिया पुणे येथे करणार आहेत. आजपर्यंत मागील १५ वर्षांमध्ये डॉ.सुगांवकर यांनी यशस्वी ८५०० पेक्षा जास्त बालहृदय शास्त्रक्रिया केल्या आहेत.

अध्यक्षीय समारोप करताना अक्षय मुंदडा यांनी या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले व ग्रामीण भागातील मुलांसाठी हे शिबीर जीवनदान ठरेल असे नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संतोष मोहिते यांनी केले तर प्रा.रोहिणी पाठक यांनी आभार व्यक्त केले. या शिबिरामुळे अंबाजोगाई व परिसरातील अनेक गरीब व गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बाळासाहेब लोमटे, डॉ. लक्ष्मण मोरे, डॉ.गवळी, डॉ.शहाजी लोमटे, धनराज सोळंकी,कल्याण काळे, अविनाश मुडेगावकर,राधेश्याम लोहिया, राजेंद्र घोडके, बालाजी घाडगे, चे डॉ.राहुल वरोडे, डॉ.संजय पूजदेकर, डॉ.स्वाती जावळे, डॉ.कमलाकर साखरे, डॉ घुबडे, डॉ. बाराहाटते, डॉ.दीपाली मोहेकर, घुगे हॉस्पिटलचे कर्मचारी, सर्व आशा स्वयंसेविका व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

# मच्छिंद्र गडावरील चैनचोरास बीडमध्ये पकडले

बीड /प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मच्छिंद्रगड मायंबा देवस्थान या ठिकाणी यात्रेत चोरी केलेल्या चैन चोराला बीडमध्ये चैन विक्री करताना ताब्यात घेतले. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली.



दिनांक १९ डिसेंबर रोजी मायंबा देवस्थान मच्छिंद्रगड सावरगाव येथील यात्रेतून एका इसमाची सोन्याची चैन चोरीला गेली होती. याप्रकरणी अंभोरा पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिताप्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. या चौरीचा तपास चालू असतांना स्थानिक गुन्हे शाखेचे पोह. अशोक दुबाले,पोह. सोमनाथ गायकवाड,पोह.बाळू सानप,चापोअ सिद्धेश्वर मांजरे यांना गुप्त बातमीदार दारा मार्फत माहिती मिळाली की अंगामध्ये निळा व पांढरे पट्टे असलेला शर्ट घातलेला आणि फिकट निळ्या रंगाची पॅन्ट घातलेला इसम सोन्याची चेन विक्री करण्यासाठी बीडमध्ये आला आहे. पोलिसांनी चऱ्हाटा फाटा येथे सापळा रचून सुधीर रावसाहेब कराळे रा. धामणगाव तालुका पाथर्डी याला एक फेब्रुवारी रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीला गेलेली चैन जप्त करून त्याला अंभोरा पोलिसांच्या ताब्यात दिले. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंडेवाड ,अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप सिद्धेश्वर मांजरे यांनी केली.

# परळी वैजनाथमध्ये १३ फेब्रुवारीपासून अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन

**मुंबई । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू आहे. या पशुपक्षी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.**

या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळतील. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. ''या प्रदर्शनाच्या माध्यमातून पशुपालकांना पशुसंवर्धनाविषयीची संकीर्ण व अद्ययावत माहिती एकाच छताखाली उपलब्ध होईल. याचा मोठा फायदा पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी होईल,'' असा विश्वास पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी व्यक्त केला आहे. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# ॲड.बी. डी. हंबर्डे महाविद्यालयात आज भव्य रोजगार मेळावा

आष्टी । प्रतिनिधी

तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली ॲड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी यांच्या वतीने उद्या दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण व निमशहरी भागातील युवक-युवतींना औद्योगिक क्षेत्राशी थेट जोडून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश आहे.

या रोजगार मेळाव्यात देशातील नामांकित औद्योगिक व बहुराष्ट्रीय कंपन्या सहभागी होणार असून, त्यामध्ये फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रा. लि. (रांजणगाव), जॅबिल सर्किट इंडिया प्रा. लि., एपिटोम कॉम्पोनन्ट्स प्रा. लि. तसेच हायर अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. यांचा समावेश आहे. संबंधित कंपन्यांच्या वतीने श्री. विशाल सी. उबाळे, धनश्री मॅडम, श्री. तुषार निंबाळकर आणि श्री. आफ्रोज खान हे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेणार आहेत.

या रोजगार मेळाव्यात आयटीआय, डिप्लोमा, पदवी () बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी, बी. बी.ए, बी. सी.ए., बी.एस्सी. संगणक शास्त्र, पदव्युत्तर () तसेच बी.ई./बी.टेक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून, सुमारे २५०० रिक्त पदांसाठी संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. निवड झालेल्या उमेदवारांना रु. १४,००० ते रु. ४०,००० पर्यंत वेतन दिले जाणार असून, त्याचबरोबर वाहतूक (बस) व कॅन्टीन अशा सुविधा देखील कंपन्यांच्या वतीने देण्यात येणार आहेत. अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे यांनी दिली आहे. तसेच पात्र उमेदवारांनी आवश्यक शैक्षणिक कागदपत्रे, बायोडाटा (रेझ्युमे) व ओळखपत्रासह वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी व्हावी, यासाठी उपप्राचार्य डॉ. बाबासाहेब मुटकुळे, उपप्राचार्य डॉ. अविनाश कंदले, नॅक समन्वयक निवृत्ती नानवटे, विद्यार्थी संसदेचे सर्व पदाधिकारी, करिअर काउन्सेलिंग सेलचे सर्व पदाधिकारी, करिअर कट्ट्याचे समन्वयक डॉ. रमेश भारूडकर, प्रा. रवी सातभाई हे सर्वजण नियोजन, समन्वय व व्यवस्थापनाच्या पातळीवर विशेष परिश्रम घेत आहेत.

ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या प्रत्यक्ष संधी उपलब्ध करून देणारा हा रोजगार मेळावा युवकांच्या करिअरला दिशा देणारा ठरणार असून, शिक्षणासोबतच रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्याची महाविद्यालयाची सामाजिक व शैक्षणिक बांधिलकी या माध्यमातून ठळकपणे अधोरेखित होत आहे. त्यामुळे परिसरातील अधिकाधिक युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ईगलवूड शाळेचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**माजलगाव । प्रतिनिधी**

ईगलवूड इंग्लिश स्कूल येथे शैक्षणिक वर्ष २०२५२०२६ चे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात दोन्ही दिवशी दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमापूजनाने करण्यात आली. पहिल्या दिवशी कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. यामध्ये कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ.सुशील भैय्या लोढा यांनी भूषविले तर दत्ता डाके, ज्ञानेश्वर मेंडके,खलील पटेल,हरिभाऊ सोळंके,अरुण इंगळे,जुगलकिशोर नावंदर,सुनील तौर,रेश्मा मेंडके,सुरेश एरांडे,महेंद्र मस्के,तानाजी सिरसट,गोविंद इतापे,इम्रान खान,ॲड.काझिम मनसबदार,पृथ्वीराज तट,अँड.शैलेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.




दुसऱ्या दिवशीही विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुण्यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान डॉ.शरद पवार यांनी भूषवले.तर पाहुणे म्हणून दीपक जाधव,राहुल लगडे,शरद यादव, सौ.सुचिता होके, सौ.वनिता फुलगे, ॲड.सुलभा देशमुख,भागवत भोसले,नितीन काळे,डॉ.शैलेश पाठक,सुहास बोराडे,अन्वर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

दोन्ही दिवशी मान्यवर पाहुण्यांनी आपल्या भाषणातून शाळेच्या शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांमधील संस्कार, शिस्त व आत्मविश्वासाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पहिल्या दिवशी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.गुंजन जोशी आणि आर्या खुळे आणि इतर विद्यार्थ्यांनी तर दुसऱ्या दिवशी काळे वरद आणि गायकवाड यशश्री व इतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक विभाग प्रमुख अर्जुन तौर यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत प्रभावीपणे केले. दोन्ही दिवशी शाळेच्या वार्षिक कामकाजाचा आढावा प्राचार्य सत्यजित कांजाळकर व उपप्राचार्य प्रणिता कांजाळकर यांनी घेतला. संस्थेचे सचिव डॉ.शरद पवार यांनी शाळेच्या विकासात्मक वाटचालीचे कौतुक केले.विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याविष्कारांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विविध गीतांवर आधारित समूह नृत्य व लोकनृत्यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ.अर्चना पवार, शाळा व्यवस्थापन, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पान ६ वरुन...


### सिंदफणा नदीवर साखळी

चव्हाण यांच्यासह गावकरी व परिसरातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते उपस्थित होते. आमदार सुरेश धस म्हणाले की, शिरुर कासार तालुक्यातील शेतीला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. तालुक्यातील वाहणाऱ्या प्रमुख अशा सिंदफणा नदीवर कोळवाडी येथे बंधारा उभारल्याचा पाच ते सहा गावांना फायदा झाला असून सुमारे दिडशे हेक्टरपेक्षा अधिक शेती ओलीताखाली येणार आहे. या नदीवर तसेच कापरी व अन्य नद्यावर गरजेनुसार साखळी बंधारे उभारण्याचा संकल्प आहे. यामुळे बहुतांश गावांना पाणी उपलब्ध होईल असे नियोजन आम्ही करत आहोत. शेतकऱ्यांसाठी उभारलेले बंधारे केवळ सरकारच्या जबाबदारीवर सोडून चालणार नाहीत. सगळं काही सरकार करत नसते. हा बंधारा तुमच्यासाठीच निर्माण केला आहे, त्यामुळे शेतकऱ्यांनी दोन महिन्यांच्या आत बंधारा ताब्यात घ्यावा व त्याच्या दुरुस्ती व देखभालीची काळजी घ्यावी.'' सिंदफणा नदीवर आणखी दोन बरेज बंधारे प्रस्तावित असून सध्या त्यासाठी सर्वेक्षण सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, भविष्यात आवश्यक ठिकाणी आणखी बरेज बंधारे उभारण्याचा मानस असून यामुळे परिसरातील शेतीचा पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निवृत्ती बेदरे सर यांनी सुत्रसंचालन केले तर पत्रकार सूर्यकांत नेटके आभार मानले.

आदर्श दाखवून द्या : सुरेश अण्णा धस

कोळवाडी येथील गावकऱ्यांची चाळीस वर्षाची मागणी यंदा पुर्ण झाली. त्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीन प्रस्तावीकात पत्रकार सूर्यकांत नेटके यांनी या बंधाऱ्याचा शेतीला किती आणि कसा फायदा होत असल्याचे सांगत आभार मानले. सुरेश धस म्हणाले, ''बंधाऱ्याला होण्याला खरं तर उशिर झाला. पण उशिराने झालेले काम चांगले आणि गोड आहे. आता बंधारा संभाळण्याची जबाबदारी गावकऱ्यांची आहे. यापुढे कायम पाणी साठवण टिकायचे असेल तर शेतकऱ्यांनी एकत्र येऊन तातडीने पाणी वापर संस्था स्थापन करुन बंधाऱ्याचा ताबा घ्या. कोळवाडीच्या गावकऱ्यांनी केलेला आदर्श मला इतर गावांत सांगता येईल असा या गावांतून आदर्श दाखवून द्या.

# ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या



शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील खोकरमोह शिवारात एका ३० वर्षीय तरुणाची दगडाने ठेचून निर्घृण हत्या झाल्याची खळबळजनक घटना सोमवार (दि.२) रोजी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे व तणावाचे वातावरण पसरले आहे. रायमोह येथील रहिवासी व रंगकाम (कलर) व्यवसाय करणारा चांद उर्फ गुड्डू अलाउद्दीन तांबोळी (वय ३०) हा तरुण खोकरमोह शिवारात मृत अवस्थेत आढळून आला. त्याच्या डोक्यावर व शरीरावर दगडाने जबर मारहाण केल्याच्या खुणा दिसून येत असून, हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. ही घटना सोमवारी सकाळी सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली.घटनेची माहिती मिळताच शिरूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, रायमोह पोलीस चौकीचे रवी उबाळे यांच्यासह पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.दरम्यान, या खुनामागील नेमके कारण अद्याप समोर आले नसून, वैयक्तिक वाद, जुन्या भांडणातून की अन्य कोणत्या कारणातून हत्या झाली याचा पोलीस तपास करत आहेत. शिरूर कासार पोलीस पुढील तपास करत असून, संशयितांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

# शेतकरी व पशुधन हितासाठी अभिनव संशोधनास भारत सरकारचे पेटंट

## रोहित चव्हाणचे गौरवशाली यश; गेवराईचे नाव राष्ट्रीय पातळीवर केले उज्वल

गेवराई । प्रतिनिधी

शेतकरी आणि पशुधन संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अभिनव संशोधनास भारत सरकारकडून पेटंट (डिझाइन नोंदणी) प्राप्त झाल्याने गेवराई तालुक्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल झाले आहे. व्हेटरनरी शिक्षण घेत असताना रोहित राजेंद्र चव्हाण याने केलेल्या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन अधिनियम २००० अंतर्गत अधिकृत नोंदणी मिळाली असून हे यश ग्रामीण भागातील तरुण संशोधकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



गेवराई कृषी कार्यालयातील सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र चव्हाण यांचा मुलगा रोहित चव्हाण याने विकसित केलेल्या संशोधनाचे नाव ''आपत्तीच्या वेळी पशुधनाच्या सुरक्षित बचावासाठी पशूंना नियंत्रित करून सोडवणारे विशेष उपकरण'' असे आहे. या संशोधनामध्ये पूर, आग, भूकंप, अपघात अशा नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अडकलेल्या पशुधनाचा सुरक्षित, वेदनारहित व प्रभावी पद्धतीने बचाव करण्यासाठी विशेष उपकरणाची रचना करण्यात आली आहे. सदरील उपकरणामुळे पशुधनाला इजा न होता त्यांना नियंत्रित करणे व आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ सुटका करणे शक्य होणार आहे.

आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी पशुधन वाचवताना पशुपालक, पशुवैद्यक व बचाव पथकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी हे अभिनव उपकरण अत्यंत उपयुक्त ठरणार असून शेतकरी, पशुसंवर्धन विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांसाठी हे संशोधन मोलाचे ठरेल, असा विश्वास तज्ज्ञांकडून व्यक्त केला जात आहे. या संशोधनास भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी मिळाल्यामुळे रोहित चव्हाण याच्या कार्याची अधिकृत दखल घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तरुण विद्यार्थ्याने व्हेटरनरी शिक्षणादरम्यान असे नाविन्यपूर्ण संशोधन करून राष्ट्रीय स्तरावर ओळख निर्माण करणे ही अभिमानाची बाब मानली जात आहे. दरम्यान शेतकरी हितासाठी व पशुधन संरक्षणासाठी असे संशोधन भविष्यात क्रांतिकारी बदल घडवेल, असा विश्वास गावरान ॲग्रो प्रोड्यूसर कंपनी लिमिटेड, गेवराईचे अध्यक्ष भाऊसाहेब लवटे, यांनी यावेळी व्यक्त केला. रोहित चव्हाण याच्या या यशामुळे गेवराई तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठेत भर पडली असून भविष्यात त्यांच्या संशोधनाचा प्रत्यक्ष वापर शेतकरी व पशुपालकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल रोहित राजेंद्र चव्हाण याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत असून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

cmyk

# अर्थसंकल्पात शेतकऱ्याचा जीव, घाम आणि कर्जबोजा कुठेही नाही ! शेट्टींचा हल्लाबोल

मोदी सरकारने सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे शेतकऱ्यांच्या ताटात रिकामी थाळी ठेवून त्यावर विकासाची जाहिरात लावण्याचा निर्लज्ज प्रकार केल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टी यांनी केली आहे. सरकारने पुन्हा एकदा आकड्यांचा खेळ केला आहे. पण या आकड्यांत शेतकऱ्याचा जीव, घाम आणि कर्जबोजा कुठेही दिसत नाही. अर्थसंकल्पातील तथाकथित तरतुदी पाहिल्या तर हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांसाठी नसून शेतकऱ्यांच्या नावाने केलेली फसवणूक आहे. नारळ संशोधन केंद्रांच्या नावाखाली देशातील शेतकऱ्यांच्या हातात नारळ दिल्याची टीका शेट्टींनी केली. हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटसाठी फायदेशीर आणि शेतकऱ्यांसाठी घातक असल्याचे शेट्टी म्हणाले.

सर्वप्रथम पंतप्रधान किसान सन्मान निधीचा विचार करू. दरवर्षी ६००० रुपये म्हणजे महिन्याला फक्त ५०० रुपये. खताचा एक गोणपाट १५०० ते १८०० रुपये आहे, डिझेलचे दर ९० रुपयांच्या पुढे आहेत, बियाण्यांचे दर दुपटीने तिप्पटीने वाढले आहेत.



एका एकराचा उत्पादन खर्च किमान ३५ ते ४५ हजार रुपये असताना ६००० रुपयांची मदत म्हणजे सरकारने शेतकऱ्याची थट्टा उडवली आहे. महागाई दरवर्षी वाढतो, पण ही रक्कम गेल्या अनेक वर्षांपासून तशीच आहे. हे कोणते आर्थिक गणित आहे?

सरकार शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याची भाषा करते, पण अर्थसंकल्पात त्याचे गणित कुठे आहे? जर उत्पन्न दुप्पट करायचे असेल तर उत्पादन खर्च कमी करावा लागतो किंवा मिळणारा दर वाढवावा लागतो. उत्पादन खर्च वाढतच चालला आहे आणि हमीभावाला कायदेशीर दर्जा देण्याबाबत सरकार मुद्दाम मौन बाळगते. स्वामिनाथन आयोगाने सुचवलेला २+५०% फॉर्म्युला स्वीकारण्याची सरकारची हिंमत नाही, कारण त्यामुळे कॉर्पोरेट व्यापाऱ्यांचे नफे कमी होतील. कर्जबाजारीपणाच्या प्रश्नावर हा अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी ठरतो. देशातील ७० टक्क्यांहून अधिक शेतकरी कर्जात आहे. दरवर्षी हजारो शेतकरी आत्महत्या करतात, पण सरकार कर्जमाफीऐवजी कर्ज पुनर्रचनेची गुळगुळीत भाषा वापरते. कर्जमाफी म्हणजे आर्थिक शिस्त बिघडते, असे सांगणारे सरकार उद्योगपतींची लाखो कोटींची कर्जमाफी मात्र एका सहीने माफ करते. हे दुहेरी आर्थिक धोरण नाही तर काय? असा सवाल शेट्टींनी केला.

**हमीभावाची कायदेशीर हमी द्या**

कृषी क्षेत्राचा जीडीपीतील वाटा सुमारे १५ टक्के आहे, पण देशातील ५० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या अजूनही शेतीवर अवलंबून आहे. तरीही कृषी क्षेत्रासाठीचा अर्थसंकल्पीय वाटा अत्यंत तुटपुंजा आहे. सरकारला जर खरंच शेतकरी वाचवायचा असेल तर सार्वजनिक खरेदी व्यवस्था मजबूत करावी लागेल, बाजारातील दलालांची लूट थांबवावी लागेल आणि शेतमालाला किमान हमीभावाची कायदेशीर हमी द्यावी लागेल.

**कॉर्पोरेटसाठी फायदेशीर आणि शेतकऱ्यांसाठी घातक :** हा अर्थसंकल्प कॉर्पोरेटसाठी फायदेशीर आणि शेतकऱ्यांसाठी घातक आहे. आकड्यांच्या जंजाळामागे लपवलेली ही शेतकरीविरोधी नीती देशातील अन्नदाता उद्ध्वस्त करत आहे. शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे, जाहिरातीचा विषय नाही. सरकारने हे आर्थिक वास्तव लवकरात लवकर समजून घेतले नाही, तर शेतकरी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही,असा इशारा शेट्टींनी दिला.

# तुर बाजार दराने ओलांडला ९ हजारांचा उंबरठा

## १० हजाराचा टप्पा गाठण्याची शक्यता

खुल्या बाजारात तुरीच्या दराने मोठी उसळी घेतली असून, वाशिम जिल्ह्यातील विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये नव्या तुरीचे दर प्रतिक्विंटल नऊ हजार रुपयांच्या पुढे गेले आहेत. त्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मानोरा कृषी उत्पन्न बाजार समितीत शुक्रवारी नव्या तुरीला कमाल ९,१५० रुपये प्रती क्विंटल असा उच्चांकी दर मिळाला.

यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे तुरीच्या पिकाला मोठा फटका बसला असून, उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. अनेक भागांत पीक पूर्णतः हातातून गेल्याने बाजारात तुरीची आवक मर्यादित आहे. याचा थेट परिणाम दरवाढीवर होत असल्याचे चित्र सध्या बाजारात दिसून येत आहे. इतर शेतमालाच्या तुलनेत यंदा तुरीचे उत्पादन कमी असून, त्यातच दर्जेदार मालाला वाढलेली मागणी, साठेबाजीवरील निर्बंध आणि बाजारातील वाढती गरज यामुळे आगामी काळातही तुरीचे दर स्थिर राहण्याची किंवा आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तूर विक्री करताना विविध बाजार समित्यांतील दरांची तुलना करूनच निर्णय घ्यावा, असे आवाहन बाजार तज्ज्ञांनी केले आहे. उत्पादनातील घट आणि मागणीतील वाढ लक्षात घेता काही महिने तुरीच्या दरातील तेजी कायम राहण्याची शक्यता असून, ही बाब शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे. नव्या तुरीच्या दरात वाढ होत असतानाच बाजार समित्यांमध्ये जुन्या तुरीचे दरही तेजीत आहेत. शुक्रवारी वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीत जुन्या तुरीला कमाल ८,१०० रुपये प्रती क्विंटल दर मिळाला. तुरीच्या दरात सातत्याने वाढ होत असताना बाजार समित्यांमध्ये या शेतमालाची आवकही वाढू लागली आहे.

**शासकीय खरेदीच्या घोषणेचा आधार**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी महाराष्ट्रात ३.३७ लाख टन तुरीची हमीभावाने खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. रविवार, २५ जानेवारी रोजी यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. आगामी काही दिवसांत शासकीय खरेदी सुरू होण्याची शक्यता असून, या घोषणेमुळे खुल्या बाजारातील तुरीच्या दरांना मोठा आधार मिळणार आहे.



# गव्हावर काळा व नारंगी तांबेरा रोग



गेल्या काही दिवसांपासून खूप ढगाळ वातावरण आहे. हवेत ओलसरता जास्त आहे आणि तापमानही थोडे वाढले आहे. अशा परिस्थितीत गहू पिकावर रोग आणि किडींचा प्रादुर्भाव वाढतो, त्यामुळे उत्पादनावर थेट परिणाम होतो. शेतकऱ्यांनी लवकर काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे.

**ढगाळ हवामानाचे परिणाम :** ढगाळ आणि ओलसर हवामानात गहूवर करपा आणि तांबेरा या रोगांचा धोका वाढतो. तसेच मावा कीड देखील वाढते.

सूर्यप्रकाश कमी मिळाल्यामुळे पिकाचे प्रकाश संश्लेषण कमी होते आणि अन्ननिर्मिती घटते, ज्यामुळे दाण्यांचे उत्पादन कमी होते.

**रोगांपासून संरक्षण :** गव्हावर काळा आणि नारंगी तांबेरा करपा या रोगांमुळे ९०% पर्यंत नुकसान होऊ शकते. तांबेरा रोग दिसताच, पिकावर मॅन्कोझेब ७५ किंवा झायनेब ७५ ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करावी. किंवा टेब्यूकोनॅझोल ५०% + ट्रायफ्लॉक्सीस्ट्रोबीन २५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करता येईल.तांबेरा प्रतिबंधक विद्यापीठाने तयार केलेले वाण पेरणीसाठी वापरणे फायदेशीर आहे. करपा रोगासाठी पिकावर कॉपर ऑक्सिक्लोराईड + मॅन्कोझेब २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून पंधरा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.

**कीड नियंत्रण :** गव्हावर मावा, खोडमाशी आणि खोडकिडा हानिकारक आहेत. मावा दिसताच मेटारायझियम ॲनीसोप्ली ५० ग्रॅम, बीव्हेरिया बॅसियाना ५० ग्रॅम किंवा व्हर्टिसिलियम लेकॅनी ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात फवारणी करावी.रासायनिक पद्धतीने नियंत्रणासाठी थायोमेथॉग्जाम २५% दाणेदार १ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात पंधरा दिवसांच्या अंतराने एक किंवा दोन फवारण्या कराव्यात.

**पिकाला पाणी देण्याची काळजी :** ढगाळ हवामानात गहूला जास्त पाणी देऊ नका. पाण्याची फवारणी अंतराने करा जेणेकरून मातीची ओलसरता योग्य राहील आणि रोगांचा धोका कमी होईल.

**जमिनीवर पडलेला गहू :** काही भागात वारा-पावसामुळे गहू झोपून गेला आहे. अशा स्थितीत पिकाचे व्यवस्थापन करणे कठीण आहे. फुलोरा अवस्थेतील गहू सूर्यप्रकाश मिळाल्यावर पुन्हा उभा राहतो, त्यावर अन्नद्रव्यांची फवारणी करून वाचवता येते. परंतु ओंब्या भरलेल्या गव्हाचा पुन्हा उभा राहण्याची शक्यता फार कमी आहे.

**अन्नद्रव्यांची फवारणी :** ऊन आल्यावर उभा राहिलेल्या गव्हामध्ये सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड २ १० मिली प्रति लिटर पाण्यात पेरणीनंतर ३०३५ आणि ६०६५ दिवसांनी फवारणी करावी. किंवा १९:१९:१९ विद्राव्य खत २% (२०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) पेरणीनंतर ५५ आणि ७० दिवसांनी फवारणी करावी. दाणे भरण्याच्या अवस्थेत ०:५२:३४ विद्राव्य खत १०० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करणे फायदेशीर आहे.

# जनावरांची वार अडकण्याची कारणे आणि उपाय

पशुपालन व्यवसायामध्ये जनावरांना देखील विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. यातील काही समस्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून तर काही प्रजननाच्या वेळी निर्माण होतात. प्रजननाच्या संबंधित समस्या जनावरांना उद्भवल्या तर त्याचा थेट परिणाम हा पशुपालनाच्या आर्थिक गणितावर होतो. जनावरांमध्ये व्यायल्यानंतर वार अडकणे ही एक सर्वसामान्यपणे आढळणारी समस्या आहे. यावेळी जनावरांची काळजी घेणे गरजेचे असते. जनावर व्यायल्यानंतर जार हा सहा ते सात तासाच्या आत पडणे आवश्यक असते. बऱ्याचदा तसे न होता त्याला वेळ लागतो. याची बरेच कारणे आहेत. वार म्हणजे जार हा एक गर्भाशयात तयार होणारा तात्पुरता अवयव असून वासराचा जन्म झाल्यानंतर शरीराकडून वासरास होणारा रक्तप्रवाह बंद झाल्यामुळे त्याच्या पेशी निर्जीव होतात व पाण्याचा अंश कमी झाल्याने वार आकुंचन पावते. यामुळे तिचा गर्भाशयाची संपर्क तुटतो व ती लांब होते. परंतु बऱ्याचदा ती अडकते.

**वार अडकण्याची प्रमुख कारणे :** जनावरांमध्ये असलेल्या अनुवंशिकतेमुळे वार पडू शकत नाही. प्रथमतः प्रसूत होणारी जनावरे व वय झालेली जनावरे गाभण काळ पूर्ण होण्याआधीच प्रसूती झाल्यास वार अडकू शकते. नर वासरू असल्यास वार अडकू शकते. व्यायला आलेली गाय किंवा म्हैस जास्त अंतर चालवत नेल्यास, योग्य प्रमाणात



व्यायाम न दिल्यास वार अडकू शकते. जनावरांमध्ये असलेले संप्रेरकांचे कमी प्रमाण वार अडकणे मागे प्रमुख कारण आहे. कॅल्शियम, फास्फोरस, आयोडीन सारख्या खनिज द्रव्यांची कमतरता. जीवनसत्व अ किंवा कॅरोटीन व जीवनसत्व ब सारख्या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे वार अडकू शकते. हे प्रमाण लठ्ठ गाईंमध्ये जास्त प्रमाणात दिसते. गर्भाशयाची आकुंचन व प्रसरण पावण्याची क्रिया कमी होणे. एखाद्या वेळेस विषबाधा, ॲलर्जी झाली तरी वार अडकू शकते. जनावरांनी बुरशीजन्य खाद्य खाल्ले तरी त्याचा परिणाम वार अडकण्यामध्ये मध्ये होतो. शस्त्रक्रिया करून वासरू काढल्यास वार अडकून राहण्याची शक्यता वाढते. गर्भाशयात पीळ पडल्यामुळे वार अडकण्याची समस्या निर्माण होते.

**वार अडकू नयेत यासाठी उपाय :** जनावरांमध्ये वार अडकू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून व्यायला आलेल्या गाई, म्हशी दररोज तासभर मोकळे सोडाव्यात त्यांना कमीत कमी एक किलो मीटर चालवत न्यावेत. तसेच तज्ञ पशुवैद्यकांच्या सल्ल्याने व्यायला आलेल्या जनावरांची काळजी घ्यावी.इतर नैसर्गिक घरगुती उपाय : जनावर विल्यानंतर दोन तासाच्या आत जनावरांना एक मुळा खाऊ घालावा.समजा जनावर व्यायलास आठ तास झाले तरी जार पडला नसेल तर दीड किलो भेंडीचे दोन भागात काप करावेत व गूळ व मिठासोबत जनावराला खाऊ घालावे. जनावर व्यायल्यानंतर बारा तास उलटून देखील जार पडला नसेल तर जार अर्थात वाराच्या मुळाशी गाठ बांधून गाठी पासून तीन इंच खालून वार कापावा. गाठ योनिमार्ग पर्यंत परत जाते. हाताने वार काढण्याचा प्रयत्न करू नये. जनावर व्यायल्यानंतर चार आठवडे होईपर्यंत एक मुळा प्रत्येक आठवड्याला खाऊ घालावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### भारतीय तटरक्षक दल दिवस

**महत्वाच्या घटना**

१७८३ : स्पेनने अमेरिकेच्या स्वातंत्र्यास मान्यता दिली.
१८१५ : स्विझर्लंड येथे पहिली पनीर बनविण्याचा कारखाना बनविण्यात आला.
१८७० : अमेरिकेच्या संविधानातील १५ वा बदल अमलात आला त्यामुळे मतदानातील वंशभेद संपुष्टात आले.
१९२५ : भारतात पहिल्यांदाच विजेवर चालणारी रेल्वे व्हिक्टोरिया टर्मिनस ते कुर्ला या स्थानकांदरम्यान सुरू झाली.
१९२८ : 'सायमन गो बॅक' या घोषणांनी सायमन कमिशनचा मुंबईत निषेध करण्यात आला.
१९३४ : आजच्या दिवशी विमानाने पार्सल पाठविण्याची सेवा सुरु झाली.
१९६६ : सोव्हिएत रशियाने लूना-९ हे मानवविरहित अंतराळयान चंद्रावर उतरवले.
१९७२ : जापान च्या साप्पारो नावाच्या शहरात पहिल्यांदा आशियात हिवाळी ऑलंपिक चे आयोजन केल्या गेले.
१९९९ : भारतीय राज्य जम्मू काश्मीर मध्ये डेमोक्रेटिक जनता दल या पार्टीची पुन:स्थापना करण्यात आली.
२००६ : आजच्या दिवशी इजिप्त चे जहाज एम.एस अल-सलाम बोकॅसिओ-९८ हे जहाज समुद्रात बुडाले.
२००९ : आजच्या दिवशी शिल्पा शेट्टी यांनी राजस्थान रॉयल्स मध्ये स्वतःची हिस्सेदारी खरेदी केली.
२०१८ : आजच्या दिवशी भारताच्या अंडर-१९ क्रिकेट टीमने चौथ्यांदा वर्ल्ड कप आपल्या नावावर केला.

**जन्मदिवस । जयंती । वाढदिवस**

१८२१ : डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल - वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर (मृत्यू: ३१ मे १९१०)
१८३० : युनायटेड किंग्डमचे पंतप्रधान रॉबर्ट आर्थर टॅलबोट यांचा जन्म. (मृत्यू: २२ ऑगस्ट १९०३)
१८८७ : स्पेनचे पंतप्रधान हुआन नेग्रिन यांचा जन्म.
१९०० : तिरुवेंकट राजेंद्र शेषाद्री - रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: १९७५)
१९०९ : भारतीय स्वातंत्र्य सैनिक सुहासिनी गांगुली यांचा जन्म.
१९३८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री वहीदा रहमान यांचा जन्म.
१९६३ : रघुराम राजन - भारतीय अर्थतज्ञ
१९८३ : चित्रपट अभिनेता सिलांबरासन यांचा जन्म.

**मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन**

१४६८ : जर्मन प्रकाशक, स्वयंचलित मुद्रणाचा संशोधक योहान्स गटेनबर्ग यांचे निधन.
१८३२ : पहिले क्रांतिकारक व स्वातंत्र्यसैनिक उमाजी नाईक यांना ब्रिटिश सरकारने फाशी दिली. (जन्म: ७ सप्टेंबर १७९१)
१९२४ : वूड्रो विल्सन - अमेरिकेचे २८ वे राष्ट्राध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते (जन्म: २८ डिसेंबर १८५६)
१९५१ : वेगळ्या पाकिस्तानची मागणी करणाऱ्यांपैकी एक चौधरी रहमत अली यांचे निधन.
१९६९ : सी. एन. अण्णादुराई - तामिळनाडूचे मुख्यमंत्री (जन्म: १५ सप्टेंबर १९०९)
२००० : ला प्रसिद्ध तबलावादक उस्ताद कुरैशी अल्ला रक्खा खान यांचे निधन.
२०१२ : ला बॉलीवूड चित्रपट दिग्दर्शक राज कवर यांचे निधन.
२०१६ : ला मध्य प्रदेश चे माजी गव्हर्नर बलराम जाखड यांचे निधन.

# बटाटा पिकावरील विविध किडींचे व्यवस्थापन



बटाटा पीक हे महाराष्ट्रातील बऱ्याच भागांमध्ये घेतल्या जाते. इतर पिकांप्रमाणेच बटाटा पिकावर देखील काही प्रमाणात रोगांचा प्रादुर्भाव होतो. या रोगांवर वेळीच नियंत्रण केले नाही तर फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ शकते.

**बटाट्या वरील प्रमुख रोग आणि व्यवस्थापन :** चारकोलरॉट- या रोगाचा प्रसार मुख्यतः जमिनीतून होतो. जमिनीचे तापमान जर ३२ सेल्सिअसपेक्षा अधिक झाले तर ते रोगजंतूनापोषक ठरते.या रोगामुळे साठवणीतील बटाटेसडतात. जमिनीचे तापमान ३२ अंश सेल्सिअस यावर चढण्यापूर्वी बटाट्याची काढणी करावी किंवा पाणी देऊन जमिनीचे तापमान कमी ठेवावे.

देठ कुरतडणारी आळी- ही अळी राख्या रंगाच्या असून रात्रीच्या वेळी खोडा जवळील भाग कुरतडतात.पाने व कोवळी देट खातात. एचडी च्या बंदोबस्तासाठी क्लोरेड एम पाच टक्के पावडर हेक्टरी ५० किलो हेक्टरी जमिनीवर सायंकाळी धुराळावी. मावा व तुडतुडे- या किडी पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पाने पिवळी पडतात. याच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी मिथिल डिमॅटॉन १० मिली १० लिटर पाण्यात मिसळून किंवा फोस्पॉमिडोन८५ डब्ल्यू एमसी १० मिली १० लिटर पाण्यात फवारावे. बटाट्यावरील पतंग- ही कीड बटाट्याचे अतोनात नुकसान करते.या किडींची सुरुवात शेतातून होते. परंतु नुकसान हे साठवणुकीच्या काळात दिसून येते. या किडीच्या अळ्या पानात देठात व खोडात शिरून पोखरतात.बटाट्या मध्ये शिरून या अळ्या आतील भाग पोखरून खातात. एचडी च्या बंदोबस्तासाठी कार्बरील ५० डब्ल्यू पी १.५ किलो ७५० मिली पाण्यात मिसळून फवारावे.

# कुंटणखान्यावर धाड; ५ महिलांची सुटका, रोहाऊसचा मालक ताब्यात

## अंबड-मंठा बायपास मार्गावरील रोहाऊसच्या साइटवर सुरू होता अनैतिक व्यापार

जालना। प्रतिनिधी

कुंटणखान्यावर धाड टाकून पोलिसांनी पाच महिलांची सुटका केली. दोन जणांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई जालना ते मंठा बायपास मार्गावरील नाना रेसिडेन्सीमध्ये करण्यात आली. हायवेपासून ७० मीटर अंतरावर सुरू असलेल्या या कुंटणखान्याचा पर्दाफाश करण्यात आला. पोलिस दरवेळी बनावट ग्राहक पाठवून खात्री करतात. नंतर कारवाई करतात. परंतु, या वेळी थेट तपासणी करून कारवाई करण्यात आली. प्रताप हसनराव लहाने, मनोज मोहन सातभाई (३५, बाजार गल्ली, टेंभुर्णी ता. जाफराबाद) अशी ताब्यात घेतलेल्या आरोपींची नावे आहेत.



रो-हाऊसवर प्रताप लहाने हा काही महिलांकडून स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी वेश्या व्यवसाय करून घेत असल्याची माहिती व तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. पोलिसांनी वरिष्ठांशी चर्चा करून कारवाईचा सापळा रचला. कारवाई केली असता, या ठिकाणी दोन जणांसह पाच महिला आढळल्या. त्यांच्या ताब्यातून २३,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात तालुका पोलिस ठाण्यात अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियमनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. उपनिरीक्षक गणेश शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली रवि जोशी, सचिन आर्य, विशाल काळे, वसंत धस यांच्यासह अनैतिक व्यापार कक्षातील अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून करण्यात आली. हायवे रोडपासून जवळच असलेल्या रो-हाऊसमध्ये कुंटणखाना सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून धाड टाकली असता, एक ग्राहकही आढळला, परंतु पोलिस दरवेळी बनावट ग्राहक पाठवून खात्री केल्यानंतर कारवाई करतात, परंतु या ठिकाणी पोलिसांनी थेट घरी घुसून झडती घेतली. झडती घेत असताना एका घरात मनोज सातभाई व एक महिला आढळली. दरम्यान, अनैतिक व्यवसाय सुरू असल्यामुळे या परिसरातील काही नागरिकांनी तक्रारी केल्याचे पोलिस सांगत आहेत.

### तक्रारीवरून पोलिसांनी केली कारवाई

५ हजारांपर्यंत रक्कम घेत होते ग्राहकाकडून पोलिसांनी कारवाई केल्यानंतर सदरील महिला रो-हाऊस विक्री करण्यासाठी आहेत, असे सांगून पोलिसांची दिशाभूल केली होती, परंतु पोलिसांनी अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची खात्री केली. यानंतरच कारवाई करण्यात आली. यात ग्राहकाकडून २ ते ५ हजारापर्यंत रक्कम घेतली जात होती. यानंतर मालक व महिलांमध्ये ही रक्कम वाटून घेतली जात होती. दरम्यान, या परिसरात कमी घरे आहेत.

# छत्रपती संभाजीनगरात 'भिशी'तून माय-लेकाने घातला ३ कोटींचा गंडा

## १५ हून अधिक जणांची फसवणूक, गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

जादा परताव्याचे आमिष आणि 'भिशी'च्या विश्वासावर शहरात एक मोठा आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला आहे. केवळ सातवी पास असलेल्या एका महिलेने आपल्या मुलाच्या साथीने शहरातील १६ हून अधिक नागरिकांना २ कोटी ९९ लाख रुपयांचा गंडा घातला. विशेष म्हणजे, गुंतवणूकदारांच्या पैशांवर या महिलेने शहरात ७० लाखांचा बंगला बांधला, तर स्वतःच्या गावी शेती घेऊन तेथे मंदिरही उभारले. पैशांची परतफेड न करता धमकावणाऱ्या या माय-लेकावर मुकुंदवाडी ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.




जयश्री गजानन गिरी (४२, रा. मुकुंदवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, नंदाबाई आधुडे ही २०१४-१८ पासून भिशी चालवत होती. सुरुवातीला छोट्या रकमेच्या भिशी वेळेवर पूर्ण करून तिने महिलांचा विश्वास संपादन केला. नोव्हेंबर २०२२ मध्ये तिने १२ लाख रुपयांची भिशी सुरू केली. जयश्री गिरी यांनी त्यात १० लाख रुपये भरले होते, तर त्यांचे जुने १० लाख असे एकूण २० लाख रुपये नंदाबाईकडे जमा होते. २०१८ ते २०२५ या काळात माय-लेकांनी १५ हून अधिक लोकांकडून सुमारे २ कोटी ९२ लाख रोख आणि ६ लाख ९९ हजार रुपये ऑनलाइन स्वरुपात जमा करून घेतले. मुदत संपल्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ केल्याने हा प्रकार उघडकीस आला. फसवणूक झालेल्यांमध्ये सपना मरकड (५० लाख), मीरा फलके (५० लाख), विलास माने (३० लाख), कमलबाई सुरसे (२१.५० लाख) यांच्यासह इतर ११ जणांचा समावेश आहे.

मूळची जालना जिल्ह्यातील (ता. घनसावंगी) असलेली नंदाबाई मागील १५ वर्षांपासून शहरात वास्तव्यास आहे. भिशीच्या माध्यमातून जमा झालेल्या पैशातून तिने शहरात ७० लाखांचे घर, ३ ते ४ ठिकाणी मालमत्ता आणि गावात शेती घेतल्याचे समोर आले आहे. गुंतवणूकदारांनी पैसे मागितल्यास त्यांना उलट पोलिसांत खोट्या तक्रारी करण्याची भीती दाखवली जात होती.

# कळमनुरीत मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ

## निकृष्ठ दर्जाचे भोजन, पिण्यासाठी पाणी नाही, कडाक्याच्या थंडीत थंड पाण्याने आंघोळ करण्याची वेळ

हिंगोली। प्रतिनिधी

कळमनुरी येथे समाज कल्याण विभागाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहात वरिष्ठांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ खेळला जात आहे. निकृष्ठ दर्जाचे भोजन, पिण्यासाठी पाणी नाही अन गिझर बंद पडल्याने कडाक्याच्या थंडीतही थंड पाण्याने आंघोळ करण्याची वेळ विद्यार्थ्यांवर आली आहे. कळमनुरी येथे असलेल्या या वसतीगृहाची विद्यार्थी क्षमता १०० असून सध्या या ठिकाणी ५० विद्यार्थी राहतात. या ठिकाणी असलेल्या विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा मिळत नाही. या संदर्भात विद्यार्थ्यांकडून वारंवार तक्रारी केल्यानंतर देखील गृहपालांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांची प्रचंड हेळसांड होऊ लागली आहे.



या ठिकाणी असलेल्या सुमारे २५ ते ३० खोल्यांपैकी केवळ तीन खोल्यांमध्येच पाणी येते. त्यातही छतावर असलेल्या पाण्याच्या टाक्या मागील काही महिन्यांपासून धुतलेल्या नसल्यामुळे घाण पाणी येत आहे. हेच पाणी विद्यार्थ्यांना अंघोळीसाठी वापरावे लागत आहे. विद्यार्थ्यांना अंघोळीसाठी गरम पाण्यासाठी बसविलेले गिझर बंद पडल्याने कडाक्याच्या थंडीत विद्यार्थ्यांना थंड पाण्याची अंघोळ करावी लागत आहे. या शिवाय स्वच्छतागृहाचीही दुरावस्था झाली असून महिन्यातून केवळ एक वेळच स्वच्छतागृहाची साफसफाई केली जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांमधून करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर स्वच्छतागृहात पाणी येत नसल्याने विद्यार्थ्यांना खालच्या मजल्यावरून पाणी आणावे लागत आहे. या वसतीगृहामध्ये भोजन निकृष्ठ दर्जाचे दिले जात असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. भोजनात भाता मध्ये आळ्या निघत आहे तर वरणामध्ये किडे निघत आहे. पोळ्या देखील कच्च्या दिल्या जात आहेत. कंत्राटदारांकडे तक्रार केल्यास तुम्ही जेवण कमी खा म्हणजे चांगले जेवण देता येईल असे सांगितले जात असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, वसतीगृहातील कारभाराची विद्यार्थ्यांनी वंचित बहुजन आघाडीकडे तक्रार केल्यानंतर वंचितचे तालुकाध्यक्ष राजू कांबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी रविवारी ता. १ पाहणी केली. या पाहणीमध्ये वसतीगृहातील सर्वच गैरप्रकार पुढे आला आहे. या प्रकरणी वंचितकडून आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर समाज कल्याण विभागाचे अधिकारी अमोल घुगे यांनी वसतीगृहात धाव घेतली. यावेळी त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी तक्रारींचा पाढाच वाचला. वसतागृहातील विद्यार्थ्यांना योग्य सोयी सुविधा देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यासंदर्भात अधिकारी अमोल घुगे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याशी संपर्क झाला नाही त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष राजू कांबळे म्हणाले की, या वसतीगृहात असलेल्या गैरसोयींची चौकशी करावी तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी आमची मागणी आहे.या शिवाय वसतीगृहाच्या गृहपालावर कारवाई करावी. यापुढे विद्यार्थ्यांची गैरसोय झाल्यास वंचितकडून तिव्र आंदोलन केले जाईल.

# अवास्तव खर्चाला फाटा देऊन, आता सामुदायिक विवाह चळवळ

## संत रविदास महाराज जयंती उत्साहात साजरी, वधुवर परिचय मेळाव्यात घोषणा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

विवाह सोहळ्यांमध्ये होणाऱ्या अवास्तव खर्चाला टाळून सामूदायिक विवाह सोहळे भरवण्याची चळवळ हाती घेतली जाणार आहे. शासनाकडून अशा विवाहांना अनुदानही दिले जाते. त्यामुळे असे सोहळे भरवण्याचा निर्णय राष्ट्रीय चर्मकार विकास महासंघाने घेतला आहे. संत रोहिदास महाराज जयंती उत्सव व वधुवर पालक परिचय मेळाव्यात तसे जाहीर करण्यात आले.

चर्मकार विकास संघ व लोकनेते माजी आमदार सिताराम घनदाट सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात संत रविदास महाराज जयंतीनिमित्त वधुवर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्याचे उद्घाटन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर, श्री विशाल गणपती देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन उदमले, मनपा पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी परिमल निकम, वधूवर व पालक परिचय समितीचे अध्यक्ष संजय कानडे, राज्य उपाध्यक्ष रामदास सातपुते आदी उपस्थित होते. प्रारंभी संत रविदास महाराजांची आरती करुन त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक संजय कानडे यांनी केले. घार्गे म्हणाले की, जी माणसं देत राहतात, परोपकार करतात तीच माणसं समाजाच्या लक्षात राहतात.

संत रविदास महाराजांनी जीवनाचा मार्ग दाखविला असून, त्या मार्गावर चालण्याचे आवाहन घार्गे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कानडे यांनी केले, तर आभार सुभाष सोनवणे यांनी मानले.

दरम्यान, वधुवर पालक परिचय मेळाव्यासाठी सुमारे एक हजारांवर पालक उपस्थित होते. त्यात सुमारे २५० वधू व वरांचाही समावेश होता. आता पुढील टप्प्यात सामुदायिक विवाह सोहळे आयोजित केले जातील. त्यासाठी शासनाकडूनही अनुदान दिले जाते. अवास्तव खर्चाला टाळून असे सोहळे संघटनेकडून आयोजित केले जातील, अशी माहिती संजय खामकर यांनी दिली. यावेळी नागरिक उपस्थित होते. संत रविदासांनी दिली माणुसकीची शिकवण जीवन जगण्यासाठी जे कौशल्य, ज्ञान आवश्यक आहे, ते तत्त्वज्ञान आत्मसात केले पाहिजे. पूर्वी संत महंतांनी हे तत्त्वज्ञान साध्या भाषेत सांगितले. आज ही स्वच्छता शिकवावी लागते, पण हा संदेश संत गाडगे महाराजांनी कित्येक वर्षांपूर्वी दिला होता. भगवद्गीतेचा सार एका ओळीत परोपकार हा आहे. धर्माचे सार नाही समजले ते ज्ञान व्यर्थ आहे.

# कपड्याच्या दुकानाला भीषण आग

जालना

जालना कपड्याच्या दुकानाला भीषण आग लागून नुकसान झाले. ही घटना जालना शहरातील अलंकार टॉकीज परिसरात घडली. अग्निशमन दलाच्या प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आली. मुख्य बाजारपेठ असलेल्या अलंकार चौकाजवळील हाय स्टाइल जीन्स या रेडिमेड कपड्यांच्या दुकानाला शनिवारी रात्री उशिरा आग लागली. यात मोठे नुकसान झाले. दुकानाचे मालक अमान खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, ते मागील सात वर्षांपासून दुकान चालवत आहेत. रात्री पावणेदहाच्या सुमारास दुकान व्यवस्थित बंद करून ते घरी गेले होते. मात्र सव्वादहाच्या सुमारास त्यांच्या मोबाइलवर फोन येऊन दुकानाला आग लागल्याची माहिती मिळाली. तत्काळ घटनास्थळी पोहोचून शटर उघडले असता दुकानाच्या मागील बाजूस भीषण आग लागलेली दिसली. अग्निशमन अधिकारी माधव पानपट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक अधिकारी संदीप दराडे, वाहनचालक पंजाबराव देशमुख, नागेश घुगे, शरद भांदुर्गे, जॉन गवळे, किशोर सकट यांनी परिश्रम घेतले. तसेच सदर बाजार पोलिस, कदीम जालना ठाण्याचे कर्मचारीही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. एका तासाच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. मुख्य बाजारात कपड्याच्या दुकानाला आग लागल्यानंतर गर्दी झाली होती.

# महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार गुणगौरव सोहळा

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील गुणवंत शिक्षकांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या उत्कृष्ट योगदानाचा सन्मान करण्यासाठी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटना बीडच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद व खाजगी शाळांमधील जिल्ह्यातील ३२ गुणवंत शिक्षकांना सन्मानित करण्यात आला. सदरील आदर्श शिक्षक पुरस्कार' वितरणाचा सोहळा संघटनेचे राज्य अध्यक्ष श्री एम. ए. गफ्फार यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी हॉटेल गोल्डन चॉईस बीड येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची प्रस्ताविकता संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद यांनी सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून ए.सी.बी. चे पोलीस उपाधीक्षक सोपान चिटपिल्ले तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात शिक्षकांसह अनेक लोकांची उपस्थिती लक्षणीय ठरली. संघटनेच्या निवड समितीने सुचविलेल्या ३२ गुणवंत शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचे काम संघटनेने केले. याप्रसंगी मान्यवरांमध्ये नगर परिषद गटनेते फारोक पटेल, गटनेते खुर्शीद आलम, एम.आय. एम. चे जिल्हाध्यक्ष शफिक भाऊ, ज्येष्ठ काफमेंमर मोईन मास्टर, नगरसेवक जैतुल्ला खान, माजी उपशिक्षणाधिकारी काझी माजेद, प्रोफेसर फरीद नेहरी, दैनिक किसानचे संपादक अदनान खान, समाज सेवक मुकरम जान, मुश्ताक अन्सारी, वकील सर उपस्थित होते. तसेच संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद, अन्सारी असरार, सचिव शेख इसराईल, कार्याध्यक्ष खान अन्वर, कोषध्यक्ष सय्यद रहीम, उपाध्यक्ष पापा सर, सचसचिव शेख इरशान, शेख मोअजम, मोमीन अनिस, अब्दुल करीम, सय्यद रिजवान, मिर्झा अजमत बेग, मोमीन खैसर, शेख कलीम, शेख वसीम, शेख इम्रान, खाजा सर, सिद्दीकी सर, आरिफ सर, शाजिया बाजी, शेख फरीदा व इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खान अन्वर यांनी केले.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-६५५**
**दिनांक - ०१/१०/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती रेणुका उमेश करपे रा. महाकाळा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | शिवराज उमेश करपे | मुलगा | १२/०८/२०२० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०१/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१३४५**
**दिनांक - ०४/११/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती जाफर बापुजी शेख रा. भाबेंरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या वडिल जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | बापुजी जाणुभाई शेख | वडिल | ०३/०६/१९७० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# नमोकार तीर्थावर भक्तीचा महाकुंभ!

## ६ फेब्रुवारीपासून पंचकल्याणक महोत्सवास प्रारंभ; गणधराचार्य कुंथुसागरजींचे भव्य आगमन

छत्रपती संभाजीनगर । राजेंद्र अजमेरा

णमोकार तीर्थ येथे ६ फेब्रुवारी पासून आयोजित भव्य पंचकल्याणक महोत्सवाचा शुभारंभ होत आहे. या ऐतिहासिक सोहळ्यासाठी राष्ट्रसंत आचार्य देवनंदीजी महाराज यांचे गुरु, गणधराचार्य कुंथुसागरजी महाराज यांचे मंगल आगमन झाले असून, हजारो भाविकांनी पुष्पवृष्टी करून जय जयकारांच्या घोषणांनी त्यांचे उत्साहात स्वागत केले.



पायी विहार आणि भव्य शोभायात्रा आचार्य कुंथुसागरजी महाराज यांचीं ३ किलोमीटर अंतरावरून ही शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी मिरवणुकीत सजवलेला हत्ती, चांदीचा रथ, बँड पथक आणि मालेगावच्या जोशी मंडळाचे शंख नाद आकर्षणाचे केंद्र होते. सौधर्म इंद्र नीलम अजमेरा व कीर्ती अजमेरा या रथावर स्वार होऊन सोहळ्याचे सारथ्य करत होते. मान्यवरांच्या हस्ते पदप्रक्षालन व पूजनतीर्थक्षेत्रावर आगमन होताच शंखनाद करण्यात आला. यावेळी राष्ट्रीय स्तरावरील मान्यवरांच्या हस्ते गणधर आचार्यश्रींचे भावपूर्ण पदप्रक्षालन संतोष पेंढारी (राष्ट्रीय अध्यक्ष) बाल ब्रह्मचारी वैशाली दीदी दिनेश शेठी (राष्ट्रीय कोषाध्यक्ष) कमल ठोलिया (स्वागताध्यक्ष) महावीर गंगवाल (उपाध्यक्ष) भूषण कासलीवाल या सर्व मान्यवरांसह आचार्य श्री देवनंदीजी व त्यांच्या शिष्य परिवाराने पदप्रक्षालन केले. त्यानंतर ट्रस्टी व भक्त परिवाराच्या वतीने ३६ अष्टद्रव्यांनी विशेष पूजन करण्यात आले.या मंगल प्रसंगी कुंथुगिरी ट्रस्टच्या वतीने सौधर्म इंद्र नीलम अजमेरा आणि कीर्तीजी अजमेरा यांचा त्यांच्या समर्पित सेवेबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. चतुःराज्य भाविकांची उपस्थिती या सोहळ्यासाठी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि कर्नाटक या राज्यांतील हजारो भाविकांनी हजेरी लावली होती. रंगीबेरंगी वस्त्रे परिधान केलेल्या कलशधारी महिलांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# सिंदफणा नदीवर साखळी बंधारे करुन कायम दुष्काळमुक्ती करण्याच संकल्प

शिरुर कासार । प्रतिनिधी

शिरुर कासार तालुक्याच्या दुष्काळी भागाला कायमस्वरुपी पाणी उपलब्ध व्हावे यासाठी पुढाकार घेत आहे. शिरुर कासार तालुक्यातील सर्वच भागात सिंदफणा नदीवर तसेच कापरी व अन्य नद्यावर गरजेनुसार साखळी बंधारे उभारण्यात येणार आहेत. अतिवृष्टीमुळे सिंदफणा नदीपात्राला मोठा फटका बसला असून झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक उपाययोजना करण्यात असे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.

कोळवाडी (ता. शिरुर कासार) येथे सिंदफणा नदीवर साडेतीन कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याचे जलपुजन आमदार सुरेश धस यांच्या हस्ते रविवारी (दि. १) झाले. भाजपचे तालुकाध्यक्ष सुरेश उगलमुगले, शिरुर कासारचे नगराध्यक्ष रोहिदास पाटील, पंचायत समितचे माजी नगराध्यक्ष बाबुराव केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी पवार व माऊली आप्पा जरांगे, ज्येष्ठ नेते सुरेश थोरात, नगरपंचायतीचे गटनेते गणेश भांडेकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, नायब तहसीलदार गणेश दहिफळे, अहिल्यानगर जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष व वरिष्ठ पत्रकार सूर्यकांत नेटके, उपसरपंच नारायण मानकर, देविदास नेटके, पत्रकार अंगद पानसंबळ, युवक नेते सुधाकर नेटके, साईनाथ नेटके, ग्रामसेवक अशोक खाकाळ, संदीपान नेटके, पाडुरंग अभंग, भारत बनकर, साहित्यिक विठ्ठल जाधव, पोपट कनुजे, कल्याण तांबे, पत्रकार प्रकाश साळवे, सोनाजी मानकर, दत्ता पाटील सावंत, संदीपान नेटके, सरपंच सुदाम काकडे, सोनाजी मानकर, भरत खरमाटे, अप्पा पवने, अमोल

◀◀ पान ३ वर



## आ.सुरेश धस यांच्या हस्ते कोळवाडी येथे बंधाऱ्याचे जलपुजन









































This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी चिंचवडच्या महापौरपदी रवी लांडगे; सलग दोनवेळा बिनविरोध नगरसेवक, उपमहापौर पदाचे उमेदवार बदलण्याची वेळ

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सलग दुसऱ्यांदा सत्तेत आलेल्या भाजपचा दुसऱ्या टर्म मधील पहिला महापौर होण्याचा मान रवी लांडगे यांना मिळाला आहे. रवी लांडगे सलग दोन वेळा बिनविरोध नगरसेवक झाले आहेत. उपमहापौर पदी भाजपचे निष्ठावान शीतल उर्फ विजय शिंदे यांची निवड झाली होती. मात्र अचानक उपमहापौर पदाचे उमेदवार बदलण्याची वेळ आली आहे. पिंपरी चिंचवड मध्ये ऐनवेळी ट्विस्ट आलाय. भाजपवर उपमहापौर पदाचे उमेदवार बदलण्याची वेळ आली. शीतल शिंदे पालिकेतून निघून गेल्यानं शर्मिला बाबरांचा अर्ज दाखल करण्यात आला. तर महापौर पदासाठी रवी लांडगे यांचा अर्ज दाखल केला आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसने महापौर पदासाठी अर्ज दाखल केला नसला तरी उपमहापौर पदासाठी शर्मिला बाबरांच्या विरोधात वैशाली काळभोर यांनी अर्ज दाखल केला.



पिंपरी चिंचवड महापौर पदी भाजपच्या रवी लांडगे यांची वर्णी लागणार हे निश्चित झालं. रवी लांडगे सलग दोन वेळा बिनविरोध नगरसेवक झालेत. त्यामुळं ते महापौर पदाचे प्रबळ दावेदार होते. अपेक्षेनुसार प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाणांनी रवी लांडगे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला. मात्र यानिमित्ताने शहराध्यक्ष शत्रुघ्न काटेंच्या तोंडाला पानं पुसली गेलीत. चिंचवडचे आमदार शंकर जगतापांनी त्यांचा काटा काढला अशी चर्चा शहरात रंगलेली आहे. विधानसभेवेळी काटेंनी जगतापांविरोधात नाराजांची फळी उभी केली होती. याचा बदला जगतापांनी आत्ता काढल्याचं बोललं जातंय. खरं तर रवी लांडगे भाजपचे निष्ठावंत आहेत. मात्र विधानसभेपुर्वी रवी लांडगेनी ठाकरे सेनेत प्रवेश केला आणि पालिका निवडणुकांवेळी ते पुन्हा स्वगृही परतले. २०१७ नंतर या ही पालिका निवडणुकीत बिनविरोध नगरसेवक होण्याची किमया त्यांनी केली. त्याची बक्षिसी म्हणून पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या गळ्यात महापौर पदाची माळ घातली.

भोसरीचे आमदार महेश लांडगे यांनी सकाळीच रवी लांडगे यांच्या नावाला पसंती दर्शवली होती. काल भोसरीतील गावकी-भावकीच्या बैठकीत महेश लांडगेनी रवी लांडगेना पाठिंबा दर्शवला. त्यानंतर काही तासांत रवी लांडगे महापौर होणार हे जाहीर झालं.पिंपरी चिंचवड महापौर पदासाठी तीव्र इच्छुक असणारे निष्ठावंत शीतल शिंदेंना डावलण्यात आलं आणि त्यांचं नाव उपमहापौर पदासाठी जाहीर करण्यात आलं. यामुळं नाराज झालेले शिंदे पालिकेतून निघून गेलेत. शीतल शिंदे सलग तिसऱ्यांदा नगरसेवक झालेत. पालिकेत भाजपचे केवळ तीन नगरसेवक होते, तेंव्हापासून शिंदे हे नगरसेवक राहिलेत. मात्र २०१७ ते २०२२ दरम्यान एक ही पद पदरी न पडलेल्या शिंदेंना यावेळी पक्ष न्याय देईल, अशी अपेक्षा होती. मात्र पुन्हा एकदा डावलण्यात आल्यानं ते प्रचंड नाराज झालेत, म्हणून अर्ज न भरण्याची भूमिका शिंदेंनी घेतलीये. आता वरिष्ठ याबाबत काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. पिंपरी चिंचवड महापौर पदासाठी तीव्र इच्छुक असणारे निष्ठावंत शीतल शिंदेंना डावलण्यात आलं आणि त्यांचं नाव उपमहापौर पदासाठी जाहीर करण्यात आलं. यामुळं नाराज झालेले शिंदे पालिकेतून निघून गेले. शीतल शिंदे सलग तिसऱ्यांदा नगरसेवक झालेत. पालिकेत भाजपचे केवळ तीन नगरसेवक होते, तेंव्हापासून शिंदे हे नगरसेवक राहिलेत. मात्र २०१७ ते २०२२ दरम्यान एक ही पद पदरी न पडलेल्या शिंदेंना यावेळी पक्ष न्याय देईल, अशी अपेक्षा होती. मात्र पुन्हा एकदा डावलण्यात आल्यानं ते प्रचंड नाराज झालेत, म्हणून अर्ज न भरण्याची भूमिका शिंदेंनी घेतलीये. आता वरिष्ठ याबाबत काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे.

# शिक्षकांमुळेच शाळांचे रूप पालटतेय; हुजूरपागेच्या अमृत महोत्सवी डॉ. अरुणा ढेरे यांचे प्रतिपादन

**पुणे । प्रतिनिधी**

शिक्षक शाळेला नवे रूप देत आहेत. त्यांच्या प्रयत्नांतून प्रेरणा निर्माण होत असून, क्षमतांचा शोध घेण्याची संधी मिळत आहे. अभिमानाचा वारसा, चार-पाच पिढ्यांचा ज्ञानाचा वारसा पुढे चालविण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आहे, असे मत लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांनी व्यक्त केले.१९२६ साली मुंबई इलाख्यातून मॅट्रिक परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक यश संपादन करणाऱ्या हुजूरपागा शाळेच्या माजी विद्यार्थिनी वेणू अभ्यंकर उर्फ मैत्रेयी विनोद यांच्या यशप्राप्तीचा शतकपूर्ती समारंभ महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी,

हुजूरपागा, विश्व कल्याण गुरुकुल सेवा फाउंडेशन आणि महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या अमृत महोत्सव



सभागृहात आयोजित करण्यात आला.यावेळी लेखिका आणि शाळेच्या माजी विद्यार्थिनी डॉ. अरुणा ढेरे, पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर, विश्व कल्याण गुरुकुल सेवा फाउंडेशनच्या संचालक हिमांगी लवाटे, महर्षी विनोद सिद्धाश्रम सेवा मंडळाच्या विश्वस्त ड. अदिती वैद्य, महर्षी विनोद फाउंडेशनचे संचालक व योगगुरू डॉ. संप्रसाद विनोद, शाळेच्या माजी विद्यार्थिनी व आयएएस अधिकारी लतिका पडळकर, माजी खासदार वंदना चव्हाण, महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटीच्या सचिव रेखा पळशीकर आदी उपस्थित होते.माजी विद्यार्थीनींचे कर्तृत्व आणि हुशारी ही आजच्या विद्यार्थिनींसमोर उत्तम उदाहरणे आहेत. ज्या शाळेने ज्ञान दिले, घडवलं, शिस्त लावली त्या संकुलाबद्दल प्रत्येकाच्या मनात अभिमान असायलाच हवा, असे मत डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी व्यक्त केले. शाळेच्या माजी विद्यार्थिनी लतिका पडळकर लिखित हुजूरपागेच्या संस्कारातून घडलेल्या व्यक्तिमत्त्वांच्या प्रवासावर आधारित सामान्य ते असामान्य या पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली तनपुरे यांनी केले. साधना घोडके यांनी प्रमुख पाहुणांचा परिचय करून दिला.

# उमेदवारांना पाठबळ हीच दादांना श्रद्धांजली; आमदार शंकर मांडेकर यांचे भावनिक आवाहन

**भोर । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वत: ज्या उमेदवारांना जनतेची सेवा करण्यासाठी उमेदवारी दिली आहे, त्यांना प्रचंड मतांनी विजयी करावे, हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे भावनिक आवाहन आमदार शंकर मांडेकर यांनी केले.आंबेगाव येथील आरोह गार्डन येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या निमित्ताने भोर आणि राजगड तालुक्यातील शहरात वास्तव्यास असलेल्या मतदारांसाठी जाहीर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी उपस्थित जनसमुदाय दादांच्या आठवणींनी भावुक झाला.या वेळी भोर नगरपरिषदचे नगराध्यक्ष रामचंद्र नाना आवारे, कात्रज दूध संघाचे माजी अध्यक्ष भगवान पासलकर, भोर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संतोष घोरपडे, राजगड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष किरण राऊत, माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद देशमाने, जिल्हा परिषदेचे उमेदवार रणजित शिवतरे, अमोल नलावडे, प्रवीण जगदाळे तानाजी मांगडे यांच्यासह भोर- राजगड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पंचायत समिती उमेदवार सुवर्णा किरण राऊत, सिताताई नंदू खुळे, संदीप खुटवड, अंकुश दसवडकर राजेश बोडके, सुनीता वरे, सारिका कोंढाळकर, मनीषा कंक आदींसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वाफगाव-रेटवडी गटात अजित पवारांना भावपूर्ण श्रद्धांजली; शोकसभांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या वाफगाव – रेटवडी जिल्हा परिषद गटात रविवारी (दि १) आयोजित करण्यात आलेल्या शोक सभांना मोठी गर्दी झाली. गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार अश्विनीताई राजेंद्र पाचारणे समर्थकांनी या शोकसभांचे आयोजन केले होते. माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या सभांमध्ये गावोगावच्या कार्यकर्त्यांनी, मतदारांनी सहभाग घेऊन आपल्या लाडक्या नेत्याला साश्रूनयनानी श्रद्धांजली वाहिली. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या ऐन निवडणुकीत अजित पवारांच्या जाण्यामुळे या गटातील उमेदवारांनी गाजावाजा होणारा प्रचार थांबवला आहे. मात्र गटातील गावोगावच्या मतदारांच्या आग्रहाखातर शोकसभांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करताना माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी पक्षाच्या उमेदवारांना निवडून देणे हीच अजित पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल असे सांगितले. जिल्हा परिषदेच्या उमेदवार अश्विनीताई पाचारणे यांनी अजित पवारांच्या आठवणीं सांगत दादांच्या विचारांना साथ देण्याचे भावनिक आवाहन केले. पंचायत समितीचे उमेदवार



अजय चव्हाण वाफगाव गणात तर प्रा. बापू चौधरी हे रेटवडी गणातील शोक सभांना उपस्थित होते. पंचायत समितीचे माजी सदस्य द्वारकानाथ टिजगे , रेटवडीगावात झालेल्या शोक सभेसाठी गावच्या सरपंच निलमताई हिंगे, राष्ट्रवादीचे युवक उपाध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य किरण पवार , सदस्य मारुती पवळे , सोसायटी अध्यक्ष रामकृष्ण वाबळे , निवृत्त कृषी अधिकारी पंडितराव वाबळे ,माजी उपसरपंच शिवाजी पवळे ,माजी तंटामुक्ती अध्यक्ष मंगेश वाबळे , वसंतराव रेटवडे , सुनील वाबळे, संपत वाबळे ,ज्ञानेश्वर पवार , साहेबराव टिजगे , प्रवीण बोऱ्हाडे , दिपक काळे ,अविनाश पवळे , गोवर्धन पवळे , सुभाष पवार ,अमोल वाबळे ,मंगेश पवार , नयन खंडागळे , व इतर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाफगाव येथे झालेल्या शोकसभेला सरपंच नितीन लंगोटे, माजी सरपंच अजय भागवत, शरद थिटे, रज्जाक इनामदार, अमोल कराळे, भैय्यासाहेब कराळे, संतोष सुर्वे आदी उपस्थित होते.वरुडे गावच्या लोकनियुक्त सरपंच सुनिता पडवळ,निलेश तांबे , सदस्य पांडुरंग वाघोले, सामाजिक कार्यकर्ते हिरामण तांबे , आरोग्य दूत हनुमंत तांबे, रामभाऊ तांबे, सोसायटीचे माजी अध्यक्ष सचिन वाघोले, मोहन तांबे, राम पाटील तांबे, मयूर तांबे, ग्रामपंचायत सदस्य रुपेश तांबे, माजी उपसरपंच निशांत तांबे, सामाजिक कार्यकर्ते भीमराज मंडले, भालचंद्र रोडे, संदेश तांबे, संतोष तांबे, मारुती पोखरकर, श्रेयस सावळे, प्रज्वल गोडसे, पत्रकार काळूराम गोडसे व ग्रामस्थ उपस्थित होते. गोसासी मध्ये माजी सरपंच अप्पासाहेब गोरडे, गोविंद गोरडे, बाबाजी गोरडे , सुदाम गोरडे, संदीप गोगावले,लक्ष्मण गोरडे, अभिषेक गोरडे, पोपट काशीद व गावातील युवकांनी शोकसभेचे आयोजन केले. येथे झालेल्या सभेत गावातील महिला, युवक मतदार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्री क्षेत्र गुळाणी येथे माजी सरपंच दिलीप ढेरंगे, बाबाजी पिंगळे, सुनील तांबे पाटील, राममहाराज रोडे, किसन ढेरंगे, अर्जुन रोडे, गुलाब ढेरंगे, माणिक पिंगळे व इतर जबाबदार कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व सभांचे निवेदन पूजाताई थिगळे यांनी केले.

# पोलिस ठाण्यातून पळ काढण्याचा प्रयत्न करणारा आरोपी जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

विश्रांतवाडी पोलीस ठाण्याच्या इमारतीतून उडी मारुन पळ काढण्याच्या प्रयत्नात असलेल्या आरोपीला पोलिसांनी अटक केली. साहिल सादिक शेख (वय २१, रा. इंदिरानगर, बर्मा शेल, लोहगाव) असे त्याचे नाव आहे. याबाबत पोलीस शिपाई सचिन पवार यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी शेख याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी साहिल शेखला एका गुन्ह्यात विश्रांतवाडी पोलिसांनी ताब्यात घेतले होते. ३१ जानेवारी रोजी रात्री अकराच्या सुमारास त्याला पोलीस ठाण्यात आणले. या गुन्ह्यात त्याला ताब्यात घेऊन अटकेची कारवाई करण्यात येणार होती. त्या वेळी शेखने उलटी होत असल्याची तक्रार पोलिसांकडे केली. पोलीस ठाण्याच्या पहिल्या मजल्यावरील कक्षात त्याला ठेवण्यात आले होते. त्या वेळी पोलीस शिपाई पवार त्याच्याबरोबर होते. शेखने पवार यांचा हात झटकला. पहिल्या मजल्यावरुन उडी मारुन पसार होण्याचा प्रयत्न त्याने केला. पोलीस शिपाई पवार यांनी प्रसंगावधान राखून शेख याला ताब्यात घेतले. शेख याला अटक करण्यात आली असून, पोलीस उपनिरीक्षक सुगडे तपास करत आहेत. गेल्या महिन्यात मार्केट यार्ड पोलीस ठाण्याच्या इमारतीतून एकाने उडी मारुन आत्महत्या केली होती.

# जितेंद्र माझ्यावर विश्वास ठेव सगळं व्यवस्थित होईल; आव्हाडांनी सांगितलं अजित पवारांसोबचं शेवटचं संभाषण

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार (-क्षळीं झरुरी) यांच्या अपघाती निधनानंतर राज्यात घडामोडींना वेग आला, या घटनेनंतर अवघ्या दोन ते तीन दिवसातच दोन्ही गटांच्या एकत्रिकरणाबाबत चर्चा आणि बैठका झाल्याचे दावे पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांमध्ये संभाव्य विलीनीकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत काही बैठकाही झाल्याची माहिती आहे. या घडामोडींदरम्यान अजित पवार यांना भेटण्याआधी आदल्या दिवशी म्हणजेच २२ तारखेला शरद पवारांसोबत सिल्वर ओकवरती राष्ट्रवादीच्या नेत्यांची बैठक झाली असल्याची माहिती आहे. तर या भेटीबाबत आणि विलीनीकरणाबाबत जितेंद्र आव्हाड (गळींशपवीर -ुहरव) यांनी त्यांच्या आणि अजित पवारांच्या शेवटच्या भेटीत नेमकं काय घडलं, नेमकं काय बोलले याबाबत माहिती दिली आहे.



जितेंद्र आव्हाड म्हणाले, विलनीकरणाचा पुढाकार तर अजित पवारांनी घेतला होता. त्यांचं आणि माझं शेवटचं संभाषण झालं. हे मी आतापर्यंत बोललो नाही, तुम्हाला सांगतो या विषयावरती फार मला बोलायचं नाही. अजितदादा मला म्हणाले, जितेंद्र माझ्यावर विश्वास ठेव सगळं व्यवस्थित होईल, असंही त्यांनी आव्हाडांना म्हटल्याचं त्यांनी सांगितलं आहे. मला या चर्चेतून लांब राहायचं आहे, त्यांना काय चर्चा करायची ते करू द्या. थर्ड ग्रेड कॉन्ट्रोव्हर्सीमध्ये मला जायचं नाही. तो माणूस गेला आता त्यावर काय बोलू शकतो. तुम्ही स्पेसिफिकली विचारलं म्हणून मी तुम्हाला उत्तर दिलं. पण बाप जो निर्णय घेईल तो निर्णय आम्ही घेऊ, आपलं ठरलेलं आहे, बाप जो निर्णय घेईल ते करू. मी शांत बसलो आहे याची काही कारण आहेत. माझं ठरलं आहे, माझा बाप जो निर्णय घेईल तो माझा निर्णय असेल, असंही पुढे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे.

# खून प्रकरणातील आरोपीच्या जामिनासाठी २५ हजारांची लाच; हवालदार एसीबीच्या जाळ्यात

***बारामती । प्रतिनिधी***

खून प्रकरणात अटक केलेल्या मुलाला जामीन मिळण्यासाठी मदत करणे, तसेच न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी एका महिलेकडे २५ हजारांची लाच मागणाऱ्या पोलीस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) अटक केली. बारामतीतील वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार रमेश लक्ष्मण नागटिळक (वय ४२, रा. शारदानगर, माळेगाव, बारामती) याला अटक केली आहे.

४६ वर्षीय महिलेच्या तक्रारीनुसार त्यांच्या मुलाविरुद्ध वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल आहे. करंजेपुल पोलीस चौकीत पोलीस हवालदार रमेश नागटिळक नियुक्तीस आहे. फिर्यादींच्या मुलास जामीन मिळवून देण्यासाठी मदत करतो, तसेच आरोपपत्र न्यायालयात दाखल करण्यासाठी नागटिळक आणि उपनिरीक्षकाने ३० हजारांची रुपयांची लाच मागितली. तपासात नागटिळकने तडजोडीत २५ हजारांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. मात्र, उपनिरीक्षकाने लाच मागितली नव्हती. त्यामुळे नागटिळक याच्यावर गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजित पाटील, अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविनाश घरबुडे आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक आसावरी शेडगे तपास करत आहेत.

# पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणात न्यायालयाकडून मुख्य आरोपीसह तिघांना जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील बहुचर्चित पोर्शे कार अपघात प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय देत आरोपी आदित्य अविनाश सूद याला नियमित जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील एकूण १० आरोपींपैकी आदित्य सूद हा प्रमुख आरोपी होता. त्याच्या सोबतच न्यायालयाने आशीष मित्तल आणि अमर गायकवाड या दोघांनाही जामिनावर मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.

हा अपघात १९ मे २०२४ रोजी रात्री पुण्यातील कल्याणी नगर परिसरात घडला होता. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या अल्पवयीन मुलाने पोर्शे कारने दोन आयटी अभियंत्यांना उडवले होते. या भीषण अपघातात दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला होता. या प्रकरणात ५२ वर्षीय आदित्य




अविनाश सूद आणि ३७ वर्षीय आशीष सतीश मित्तल यांना १९ ऑगस्ट २०२४ रोजी अटक करण्यात आली होती. अपघाताच्या वेळी मुख्य आरोपी अल्पवयीनासोबत असलेल्या दोन अन्य अल्पवयीनांचे रक्तनमुने बदलून तपासात अडथळा आणल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता.

सर्वोच्च न्यायालयात आदित्य सूद याच्यावतीने ज्येष्ठ वकील प्रशांत पाटील आणि वकील आबिद मुलानी यांनी बाजू मांडली. जामीन मंजूर झाल्याची माहिती देताना प्रशांत पाटील यांनी सांगितले की, न्यायालयाने दिलासा देताना काही अटीही घातल्या आहेत. आरोपी तपास यंत्रणेला पूर्ण सहकार्य करतील आणि कोणत्याही पुराव्याशी छेडछाड करणार नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुणे पोर्शे अपघात प्रकरणाने देशभरात मोठी खळबळ उडवली होती. विशेषतः रक्तनमुने बदलण्याच्या आरोपांमुळे तपास यंत्रणा आणि प्रशासनाच्या भूमिकेवर अनेक प्रश्न उपस्थित झाले होते.

# नव तंत्रज्ञानाची कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे

**इंदापूर । प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या युगात आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करणे गरजेचे आहे. तंत्रज्ञान टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे अत्यावश्यक असून आगामी ट्रेंड्स आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत विविध अभ्यासक्रमांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी केले. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत शैक्षणिक पद्धतीत व्यापक बदल सुचविण्यात आले असून विद्यार्थी-केंद्रित दृष्टीकोनावर भर देण्यात आला. या धोरणानुसार २०४० पर्यंत सर्व उच्च शिक्षण संस्था बहुआयामी बनाव्यात असे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर ग्लोबल फाउंडेशन, इंडिया यांच्या सहकार्याने इंदापूर



महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग, वाणिज्य विभाग आणि आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने 'तंत्रज्ञान आणि शाश्वततेमधील आगामी प्रवाह' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी पाटील बोलत होते. या परिषदेची सुरुवात विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर परिषदेच्या संयोजिका डॉ. मनिषा गायकवाड यांनी आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचा उद्देश स्पष्ट केला. डॉ. भरत भुजबळ यांनी ओळख करून दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष तसेच पिंपरी चिंचवड विद्यापीठ, पुणे कुलपती हर्षवर्धन पाटील यांचे मनोगत झाले.

या उद्घाटन सत्राचे प्रमुख वक्ते अल-कुड्स ओपन युनिव्हर्सिटी, पॅलेस्टीन येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. मुन्थर मोहम्मद इब्राहिम इ्यौद होते. त्यांनी शाश्वत तंत्रज्ञान तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षण क्षेत्रावर होणारा परिणाम याबाबत मार्गदर्शन केले. या सत्रासाठी डॉ. आर. आर. भोसले यांनी प्रतिनिधींचा परिचय करून दिला, तर प्रा. मुक्ता पिसे यांनी आभार मानले. पहिल्या सत्रात संसाधन व्यक्ती म्हणून ज्ञान संसाधन केंद्र, मॉडर्न आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पुणेच्या ग्रंथपाल डॉ. संगीत धमढेरे यांनी नवीन तंत्रज्ञानाचे विविध पैलू आणि त्याचा शिक्षण क्षेत्रावर, विशेषतः ग्रंथालय व माहिती शास्त्रावर होणारा प्रभाव स्पष्ट केला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनिषा जाधव होत्या. डॉ. तानाजी कसबे यांनी आभार मानले.दुसऱ्या सत्रात महाराजा सयाजीराव विद्यापीठ, बडोदा (गुजरात) येथील प्रा. डॉ. दृष्टी भद्रेश जोशी यांनी वाणिज्य व व्यवस्थापनातील शाश्वत तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला.

# पन्नास वर्षांनंतर जुन्या आठवणींना उजाळा रहिमतपूरात रंगला राधाकृष्ण स्वामी विद्यालयाचा स्नेहमेळावा

**पुणे । प्रतिनिधी**

येथील राधाकृष्ण स्वामी विद्यालय म्हणजेच आताच्या डॉ. काकासाहेब परांजपे विद्यालयाच्या १९७५-१९७६ बॅचमधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात झाला. तब्बल पन्नास वर्षांनंतर एकत्र आलेल्या जुन्या सवंगड्यांनी आठवणींना उजाळा दिला.

मुख्याध्यापक पी. पी. वावरे, उपमुख्याध्यापक टी. व्ही भोसले, अच्युत माने, एस. एन. माने यांनी स्वागत केले. पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा चित्रलेखा माने- कदम यांनी स्नेहमेळाव्यास शुभेच्छा दिल्या. निवृत्त मुख्याध्यापक भरत निकम यांच्यासह माजी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते



गणेशपूजन व डॉ. काकासाहेब परांजपे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या वेळी गुरुवर्य पी. जी भोसले, शिवाजीराव भोसले, आशा भोसले, जी. डी. माने, औंधकर यांचे स्वागत करण्यात आले. भीमराव पाटील, पी. जी. भोसले यांनी मार्गदर्शन केले. या वेळी दादासाहेब भोसले, जब्बार पठाण, श्रीमंत माने, प्रल्हाद शेरकर, साबिरा मुल्ला, सुधाकर भोसले, विजया नेरकर, रवींद्र भोसले, रवींद्र माने, छाया माने, नजमा नदाफ, सुनंदा होमकर, रंजना जाधव, हणमंत कुंभार, उद्धव भोसले, भरत निकम, जयश्री औंधकर, शंकर खंडाईत, सुरेश सूर्यवंशी, विश्वनाथ निकम, कृष्णत जाधव, जयवंत माने, विजय काटे, रामचंद्र कदम, यासीन डांगे, अमिन आतार, अशोक पवार, हरिबा पवार, अंकुश मोरे आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. साबिरा मुल्ला यांनी सूत्रसंचालन केले. दादासाहेब भोसले यांनी आभार मानले.

# भाविकांकडून दुकानदाराला जेजुरीत काठ्यांनी मारहाण

**जेजुरी । प्रतिनिधी**

जेजुरीत दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी नंदी चौकातील महादेव श्रीरंग वाघमारे (वय ३५) या भंडारा-खोबरे विकणाऱ्या दुकानदाराला चप्पल काढण्याच्या कारणावरून भाविकांनी दुकानात शिरून काठ्यांनी बेदम मारहाण केली. दुकानाचे मोठे नुकसान केले.

शनिवारी व रविवारी खंडोबा दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. जेजुरी शहरातील नदी चौक येथे अज्ञात पाच ते सहा जणांनी 'दुकानासमोर पायातील चप्पल काढू नका', असे दुकानदाराने म्हणाल्याच्या कारणावरून शिवीगाळ करीत मारहाण केली. या पाच ते सहा जणांनी तेथे आजूबाजूला पडलेले लाकडी बांबू हातात घेऊन दुकानात शिरून मारहाण केली. दुकानाची तोडफोड करण्यात आली. भंडारा-खोबऱ्याचे भरलेले भांडे, पेढ्याचे पदार्थ पायाने हाताने फेकून देवून नुकसान केले. दुकानात शिरून फिर्यादी व इतरांना लाकडी बांबूने जोरजोरात मारहाण केली. फिर्यादी महादेव वाघमारे हे जखमी झाले आहेत. लाकडी दांडक्याने दार तोडण्याचा प्रयत्न केला.